# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

# संवाद

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

**मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।**
**सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।**

**Vol.- 6** **Issue 2** **ऑगस्ट - २०१३** **August 2013**


## संपादकीय

प्रिय 'तरुण' सभासदमित्रांनो,

नुकतीच दूरदर्शनरील 'उंच माझा झोका' ही मालिका गाजून गेली. त्या विषयीच्या अनेक आठवणी ज्येष्ठांच्या मनात अजूनही आहेत. उच्चविद्याविभूषित न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी आपल्या पत्नी रमाबाई यांनाही उच्चविद्याविभूषित बनविले. महान सामाजिक कार्य उभयतांनी केले. या पती-पत्नीचे नाव स्वत:च्या कार्यकर्तृत्वाने कालपटावर कायमचे कोरलेले आहे. त्यांच्या काळात म्हणजे शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी माणसांची वयोमर्यादा ५०-५५ वर्षे एवढीच होती. कारण तेव्हा वैद्यकीय सेवा-सुविधा अत्यंत अपुऱ्या होत्या. टी.बी., टॉयफाईड, प्लेगसारख्या रोगांमुळे मृत्यू पावणाऱ्यांचे प्रमाण जास्त होते. महिलांचे बाळंतपणातील दगावणे, बालमृत्यू यांचेही प्रमाण खूप होते. आर्थिक विवंचना, मोठा संसार, एकत्र कुटुंब, भाऊबंदकी, पारतंत्र्य आदी गोष्टींमुळे समाज गांजलेला असे. त्या वेळच्या समाजाचे हे चित्र दूरदर्शन मालिकेतूनही जाणवते.

आता मात्र काळ पूर्णपणे बदललेला आहे. उच्च प्रतीच्या वैद्यकीय सोयी-सुविधा, चांगली आर्थिक स्थिती, साथीच्या रोगांवर पूर्ण नियंत्रण, स्वच्छतेविषयी जागरूकता, व्यक्तिगत स्वातंत्र्य इत्यादी घटकांमुळे मानवी जीवनाची वयोमर्यादा आता ७५-८० वर्षांपर्यंत वाढलेली आहे. काहीजण तर वयाच्या ९०-९५ वर्षापर्यंतसुद्धा जीवन जगतात. अगदी आनंदात ते जीवनाचा उपभोग घेतात. या वाढलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊन आपणदेखील आपल्या जीवनाची स्पष्ट दिशा ठरवून आनंदाचे शिखर निश्चितपणे सर करू शकाल हा विश्वास आपल्या मनाशी बाळगा. आपलं वय कितीही असलं तरी आपण सर्वजण आमच्या मते तरुणाच आहात.

बँकेतील नोकरीमुळे आपल्यापैकी अनेकांना ऐन तरुण वयातच स्वत:चे घरदार, बढत्या, समाजात मान-सन्मान अशा अनेक गोष्टी मिळाल्या असतील. आता मात्र सेवानिवृत्तीनंतर आपल्याला ह्या समाजऋणातून मुक्त होण्याची संधी प्राप्त झालेली आहे असं मानून आपण त्या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. आदरणीय पाबळकर ह्यांनी बँकेतील सेवानिवृत्तीनंतर स्थापन केलेली पेन्शनर्स असोसिएशन' ही संघटना त्यांच्याच ध्येय धोरणानुसार सभासदांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करीत असतानाच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजकार्यही पार पाडून आपल्यापुढे नवा आदर्श घालून देत असते. त्यापासून आपणही समाजकार्याची प्रेरणा घेतली पाहिजे.

सुदैवाने आपली प्रकृती उत्तम आहे, आर्थिक स्थिती चांगली आहे, बँकेतील कामाचा अनुभव आपल्या गाठीशी आहे. समाजातील अनेक सेवाभावी संस्थांना आपल्यासारख्या ज्येष्ठ व्यक्तींच्या विविध प्रकारच्या सेवा-सहकार्याची गरज आहे. तेथे आपल्याला आपले आवडते काम करण्याची संधी  नक्कीच मिळेल. ती संधी साधून आपल्या आनंदाबरोबरच इतरांनाही आपण आनंद देऊ शकतो. ह्या सेवेपासून आपल्याला मिळणारा आंतरिक आनंद अगदी आगळा-वेगळा असतो हे लक्षात घ्या. ह्या आनंदामुळे तुमची शक्ती, ऊर्जा, जोम व मनाची उभारी वाढते. अवर्णनीय आनंदाकडे आपली वाटचाल सुरू होते. उदाहरणच द्यायचे झाल्यास आपले ज्येष्ठ मित्र श्री. एस. आर. रेगे साहेब. ते ए. जी. एम. पदावरून निवृत्त झाल्यापासून पुणे येथील 'रामकृष्ण मठा'त जाऊन सर्व प्रकारचे काम सेवाभावी वृत्तीने सातत्याने करीत आहेत. आज वयाच्या ८० व्या वर्षीही ते उत्सवाच्या दिवशी तासन्तास 'डोनेशन काऊंटर'वर बसून संस्थेसाठी देणग्या स्वीकारतात. पुण्याच्या स्टेट बँक 'विक्रांत सोसायटी'तील सौ. वसुधा देशपांडे 'निवारा वृद्धाश्रमा'त जाऊन वृद्धांना रोज जेवण वाढण्याचे काम सेवाभावनेने करतात. त्यांनी मोलकरणीच्या दोन अनाथ नातवांना एका सेवाभावी संस्थेत दाखल करून घेण्यासाठी अथक प्रयत्न केले. आज ती दोन्ही मुले डॉक्टर झालेली आहेत. या सर्वांच्यामध्ये असलेल्या नम्रतेचे, सेवाभावी वृत्तीचे, सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेचे म्हणूनच कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आपल्या या सुहृदांनी जगण्याला नवा अर्थ, नवा आयाम प्राप्त करून दिला आहे. ही मंडळी करीत असलेले कार्य म्हणजे ईशसेवाच होय. अर्थात ही काही वानगीदाखल उदाहरणे आम्ही दिली. आपल्या प्रत्येकाच्या भोवताली व माहितीत अशी उदाहरणे नक्कीच असतील. ती हेरून आपणही त्यांच्याप्रमाणेच आपले जीवन सार्थकी लावावे ही अपेक्षा आहे. मित्रहो, आपण सेवेची-सेवा देण्याची इच्छा करतो, थोडे  दिवस काम करतो. पुढे विसरून जातो. क्वचित प्रसंगी आपल्याला अपयश येते. पण त्यामुळे खचून मात्र जाऊ नका. उलट धैर्याने पुढे जा. त्यामुळे तुम्ही तुमचे अंतिम ध्येय गाठू शकाल. ते आपल्याला अत्युच्च प्रतीचा आनंद देईल. हेच आपले आनंदाचे शिखर असेल हे विसरू नका. येत्या गणेश चतुर्थीच्या सुमुहूर्तावर नव्या निश्चयाने व नव्या ऊर्जेसह जोमाने कामाला सुरुवात करा. सुखकर्ता नि दु:खहर्ता असलेल्या श्रीगजाननाचा आशीर्वादाचा हात सदैव आपल्या पाठीशी असेल याविषयी निश्चिंत राहा. सर्वांना आमच्या शुभेच्छा!

- **शरद शिंगवेकर,** पुणे   भ्रमणध्वनी -९४०५०२६४१२

(Ref : Corporate Centre e-Circular No.CDO/P&HRD-PM/22/2013-14 Dated 08-08-2013 )

**RATES OF DEARNESS RELIEF PAYABLE TO PENSIONERS** **Annexure - I**

**WHO HAVE RETIRED (A) PRIOR TO 1-11-1987 and (B) BETWEEN 1-11-1987 & 31-10-1993**

| Sr. No. Basic Pension + F.D.R. (as applicable) | Dearness Relief for the months from **August 2013 to January 2014** (Average Index - 5211) (Slabs - 1152) |
|---|---|
| i) Upto Rs.1,250=00 | 771.84 % of aggregate of Basic Pension & F.D.R. |
| ii) Rs.1,251=00 to Rs.2,000=00 | Rs.9,648=00 + 633.60 % of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.1,250=00 |
| iii) Rs.2001=00 to Rs.2,130=00 | Rs.14,400 + 380.16% of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.2,000=00 |
| iv) Above Rs.2,130=00 | Rs.14,894=20 +195.84% of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.2,130=00 |

**DEARNESS RELIEF PAYABLE TO PENSIONERS**

**WHO HAVE RETIRED ON OR AFTER 1-11-1993 UPTO 31-10-2002**

| Sr. No. Basic Pension | Dearness Relief for the months from **August 2013 to January 2014** (Average Index - 5211) (Slabs - 1015) |
|---|---|
| i) Upto Rs.2,400=00 | 355.25 % of Basic Pension |
| ii) Rs.2,401=00 to Rs.3,850=00 | Rs.8,526=00 + 294.35 % of Basic Pension in excess of Rs.2,400=00 |
| iii) Rs.3,851=00 to Rs.4,100=00 | Rs.12,794=07 + 172.55 % of Basic Pension in excess of Rs.3,850=00 |
| iv) Above Rs.4,100=00 | Rs13,225=44 + 91.35 % of Basic Pension in excess of Rs.4,100=00 |

**Dearness Relief payable to Pensioners who have retired on or after 1-11-2002 To 31-10-2007 for the months from August 2013 to January 2014**

(Average Index - CPI - for quarter ended June 2013 :- 5211 ; and No.of Slabs - 730)

**Rate of Dearness Relief on Pension :- 131.40 % of Basic pension**

(Ignore decimals from 3rd place onwards)

**Dearness Relief to Pensioners who Retired on or after 1-11-2007 for the months from August 2013 to January 2014**

(Average Index - CPI - for quarter ended June 2013 :- 5211 ; and No.of Slabs - 593)

**Rate of Dearness Relief on Pension :- 88.95 % of Basic pension**

(Ignore decimals from 3rd place onwards)

## Dearness Relief payable to Family Pensioners **Annexure - II**

(i) Dearness Relief for Family Pensioners in respect of pensioners who died or retired
(a) before 1-11-1993 (b) on or after 1-11-1993 but before 1-4-1998 and
(c) on or after 1-11-2002 will be paid as per the tables given for the pensioners in Annexure-I **(given above)**

(ii) The Dearness Relief of Family Pensioners in respect of pensioners who died or retired on or after 1-4-1998 but before 1-11-2002 will be as per the following Table :-

| Sr.No. Basic Family Pension | Dearness Relief for the months from **Aug. 2013 to Jan. 2014** (Average Index - 5211) (Slabs - 881) |
|---|---|
| i) Upto Rs.3,550=00 | 211=44 % |
| ii) Rs. 3,551=00 to Rs. 5,650=00 | Rs. 7,506=12 + 176.20 % of Basic Family Pension in excess of Rs. 3,550=00 |
| iii) Rs.5,651.00 to Rs.6,010.00 | Rs. 11,206.32 + 105.72 % of Basic Family Pension in excess of Rs.5,650.00 |
| iv) Above Rs.6,010.00 | Rs.11,586.91 + 52.86 % of Basic Family Pension in excess of Rs.6,010.00 |

## DEVELOPMENTS IN THE WRIT PETITIONS PENDING IN THE COURTS

The Federation has advised the latest position about our cases in Delhi High Court and at Karnataka High Court and Nagpur Bench of Bombay High Court as under.

**1) Our Writ Petition No.1875 / 2013 in Delhi High Court** (earlier WP No.184/2011 in the Supreme Court)

In view of the objections raised by the Counsels of the Government at the hearing held on 27-2-2003 for the final disposal of our Writ Petition, the Supreme Court directed the transfer of our above W.P. with the completed pleadings to a Bench of the Delhi High Court with a request to pronounce its judgment in six months. After this order, the above W.P. renumbered as W.P.(C) 1875/2013 was posted for hearing on 2-04-2013, 18-04-2103 and on 31-07-2013. At the first hearing on 2nd April, none of the Respondents appeared and the Judges ordered the issue of Notices to the Respondents. For W.P.(C) 1875/2013 pending in the Delhi High Court, we engaged the services of Shri.Ravindra Shrivastava, Senior Counsel and former Advocate General of the Government of Chhattisgarh State, assisted by the existing team of advocates. At the hearing held on 18-04-2013, the Government and our Bank appeared but none from RBI appeared. The Judges directed the issue of Notices to RBI but did not accede to the request of our Advocates for the issue of Dasti Notices and posted the next hearing to 31-07-2013. The first two hearings of W.P.(C) 1875/2013 were heard by the Second Division Bench of Delhi High Court. The hearing on 31-07-2013 however took place before the First Bench consisting of the Acting Chief Justice and another Judge as our W.P. is now categorized as one challenging constitutional validity of any Act, Statutory Rules or Regulations instead of under service matters as per the Roster of Delhi High Court. Although, a Registered Notice was served on RBI by the Delhi High Court as per its order dated 18-04-2013, the acknowledgement from RBI was not received by the Court. At the hearing held on 31-07-2013, the Judges ordered again for the issue of Notice to RBI. Ignoring the strong plea made by our Senior Counsel by bringing to the notices of the Judges the direction of the Supreme Court on prouncing the judgment within six months by the Delhi High Court, the Judges posted the next hearing first to 11th November and thereafter to **19th November 2013**.

**2) W.P.No.1931/2002 filed by seven pre-1993 pensioners in Delhi High Court**

The final hearing of the above W.P under the Senior Citizen's category is taking place before a single judge. Our Bank has since submitted the details of its pension fund at the hearing held on 25th July 2013. The next hearing is listed to take place on 22-08-2013.

**3) W.P In the Karnataka High Court by the Bangalore Circle Pensioners' Association**

The above W.P seeking payment of Dearness relief with 100% neutralization to pre 1-11-2002 pensioners on the same basis as paid to post 1-11-2002 pensioners with effect from 1-5-2005 is pending for final hearing before a single judge.

**4) W.P in the Nagpur Bench of Bombay High Court by the Mumbai Circle Pen. Association**

The above W.P seeking payment of family pension at 30% of pay to all family pensioners on the same basis as paid in the Pension Scheme of the Government.is also pending for final hearing before a single judge.

### DEARNESS RELIEF WITH 100% NEUTRALIZATION TO PRE 1-11-2002 PENSIONERS

Federation has been following up the above important issue with the Corporate Centre of our Bank at the Structured Meetings held and also by sending a letter dated 23-04-2013 enclosing a copy of the letter of IBA dated PD/GSN/SBI/G2/970 dated 8th September 2000 addressed to the DGM (IR)

clarifying that the Bipartite Settlements entered into by IBA do not apply to the Pension Scheme of SBI. Our Bank is yet to give its reply to above letter and has not been able to convey as to why it is not in a position to take its decision on the above issue, even many months after RBI has been making payment of D.R to all its pensioners with cent percent neutralization. Unfortunately, the Division Bench of Madras High Court has set aside the Judgments delivered by a Single Judge in the case filed by the pensioners of Canara Bank and IOB directing payment of D.R with 100% Neutralization to pre 1-11-2002 pensioners.The W.P filed by our Karnataka Circle Affiliate in the Karnataka High Court on this issue is pending for final hearing before a single Judge since 2011. Federation will continue to take up this matter with our Bank, although our Bank may take a stand that the matter is sub-judice.

## आजचे ज्येष्ठ

भरल्या घरात माझ्या मी एकटाच आहे
माझ्यातल्या जीवाला आधार मीच आहे ।।ध्रु।।

दावून जग मला हे
सोडून आई गेली
जगती करून शहाणे
गेले पिता निघूनी
गोतावळ्यात माझ्या परि एकलाच आहे ।।१।।

लेकी सुना व जाया
स्वसुखात दंग झाले
भाऊ बहीण मुलगा
व्यापात बुडून गेले
रक्तास रक्त येथे विसरून पार गेले ।।२।।

थांबावयास येथे
नाही कुणास वेळ
जो तो पळत आहे
दिन रात सर्व काळ
अन्नासवे घराची चिंता छळत आहे ।।३।।

मनसोक्त दु:ख करण्या
कोणा सवड नाही
मनमुराद सौख्य लुटण्या
आयुष्य पुरत नाही
रुपया भवति दुनिया बनित धावताहे ।।४।।

ऐशा भयाण जगती
सर्वत्र ताण आहे
दिन रात ताण साहुनी
प्रत्येक जगत आहे
आधार मीच माझा होणे अटळ आहे ।।५।।

- **आर. जी. कडवेकर,** सातारा
भ्रमणध्वनी - ९३७२६७३९८४

## नको ग माते...!

नको गं माते घात करू
भ्रूण हत्येचे पाप करू
कळी सुगंधी नको खुडू ।।धृ।।

निसर्ग नेमे सारे घडले
बीज कन्येचे तू स्वीकारले
आग्रह ‘कुलदीपकाचा नको धरू ।।१।।

गर्भी तुझ्या मी जिजाबाई
मीच झाशीची लक्ष्मीबाई
गर्भजल परिक्षण नको करू ।।२।।

पुण्यश्लोक मी अहिल्यादेवी
मीच उद्याची सावित्रीबाई
पुत्रप्राप्तीस्तव नको झुरू ।।३।।

घराण्याची मी कुलस्वामिनी
मीच इंदिरा, रणरागिणी
काळीज माझे नको चिरू ।।४।।

लताबाई उद्याची मी स्वरसम्राज्ञी
मीच शकुंतलादेवी, गणित सम्राज्ञी
अमृत हृदयीचे नको नाकारू ।।५।।

पिलां न त्यागे कधी पाखरू
गाय न विसरे कालवड वासरू
गर्भ कन्येचा नको कुस्करू ।।६।।

- **पुंडलिक भेंडे,** पुसद
भ्रमणध्वनी - ९५५२२९२९०१

## युनिट वार्ता

**खामगाव युनिट :**

खामगाव (जि.बुलडाणा) तर्फे १ जुलै रोजी 'स्टेट बँक दिवस' अभिनव पद्धतीने साजरा केला. युनीटतर्फे २५ सभासदांच्या घरी जाऊन वृक्षारोपण केले व वृक्ष संगोपनाविषयी महत्त्व पटवून दिले. तसेच खामगाव कृषी विकास शाखेच्या परिसरातही ५ वृक्ष लावले. यासाठी बँकेचे शाखाधिकारी व इतर कर्मचारी यांनी सहकार्य करून पेन्शनर्स असोसिएशनच्या या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युनीट सेक्रेटरी श्री.मुनोत, तसेच सर्वश्री बांगडबट्टी, पवार, नाईक व दुबे यांनी पुढाकार घेतला. त्याबद्दल या सर्वांचे अभिनंदन.

- मोहनसिंग मुनोत, सेक्रेटरी (खामगाव)

***********

# अभिनंदनीय

आपल्या वर्धा युनिटचे ज्येष्ठतम सदस्य - ज्यांनी वर्धा युनिट स्थापनेसाठी व स्थानिक पेन्शनर्सना असोसिएशनचे महत्त्व पटवून त्यांना एकत्रित आणण्यात अथक परिश्रम घेतले असे - श्री.शंकर यादवराव काण्णव ह्यांचा नातू चि.हर्षवर्धन आनंद काण्णव याने बारावी वाणिज्य शाखेतून ६०० पैकी ५२१ गुण मिळवून वर्धा जिल्ह्यात वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यानिमित्त येथील न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. हर्षवर्धनच्या या यशाबद्दल असोसिएशनतर्फे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन व आयुष्यातील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !

- अवधूत रोटकर, सेक्रेटरी (वर्धा युनिट)

***

आपले नागपूर झोनल सब्-सेंटरचे माजी-सेक्रेटरी श्री.जयंत वकील यांची सुकन्या सुश्री आरती ही आयकर विभागाच्या नागपूर कार्यालयात 'कार्यालय अधिक्षक' म्हणून कार्यरत असून कुशल बुद्धिबळपटू आहे. तिने गेली सतत सहा वर्षे आयकर विभागाच्या राष्ट्रीय स्तरावरील वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धांमध्ये अकरा सुवर्ण पदके व सहा रजत पदके मिळवून उत्तुंग यश मिळवले आहे. याबद्दल नागपूर क्षेत्र आयकर विभागीय कार्यालयाच्या 'आयकर वीणा' या हिंदी गृह पत्रिकेमध्ये फोटो व माहिती छापून तिचे कौतुक केले आहे. सुश्री आरतीच्या या बुद्धिबळ प्राविण्याबद्दल तिचे आपल्या असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

***

आपले धुळे येथील एक सभासद श्री.पी.एन.मुजुमदार यांची नात चि.वैभवी अनंत मेढेकर ही C.B.S.C. बोर्डाच्या १०वी च्या परिक्षेत ९५.६ % गुण मिळवून उत्तीर्ण झाली. विशेष कौतुक म्हणजे तिने सोशल सायन्स (इतिहास+भूगोल+अर्थशास्त्र) या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळविले. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व भावी आयुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

***

पुणे येथील सहसभासद सौ. अर्चना रवींद्र कुलकर्णी यांना २६ मे २०१३ रोजी शारदापीठ श्रृंगेरी येथे झालेल्या संपूर्ण 'भगवत् गीता' (१८ अध्याय) कंठस्थ स्पर्धेत जगद्गुरू श्री शंकराचार्य यांचे हस्ते पुरस्कार रोख रु. २१,०००/- व प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

***

नागपूर येथील सभासद श्री. पी. पी. कानेटकर यांची नात कु. रिद्धी अनिरुद्ध कानेटकर हिने मार्च २०१३ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत परीक्षेत ९४.७३ टक्के गुण मिळवले.

**वरील सर्वांचे त्यांनी मिळवलेल्या उज्ज्वल यशाबद्दल असोसिएशन तर्फे हार्दिक अभिनंदन.**

**- सेक्रेटरी**

## Congratulations !

Son of our member Shri.S.I.Tamboli from Solapur Dr.Mohammad Areef S.Tamboli has passed 'MS General Surgery' with First Class from Topiwala National Medical College & Nair Hospital, Mumbai in 2013. He has also secured 16th rank in Superspeciality Entrance Examination conducted by the State Government and he has been selected for 'MCH UROLOGY' in BOMBAY Hospital Institute of Medical Sciences, Mumbai.

On behalf of the Association we congratulate Dr.Mohammad Arif Tamboli for his exemplary achievement in his field.

**- Secretary**

## WELCOME MUMBAI-GOA STEAMER SERVICE

At last clearance from relevant authorities to restart the steamer services between Panaji and Mumbai docks is good reason to cheer for the people of Goa and Mumbai. Since 1988, this service was stopped for economic reasons. These services were provided by Bombay Steamship Navigation and British India Steamer Navigation followed by ships run by Chowgules. Memories come to mind of MV Konkan Sewak, MV Konkan Shakti and MV Sarita. The ships used to resume services in October and stopped sailing by fag end of May to avoid the fury of Monsoons. Sea travel to Mumbai and Goa by these steamers was most enjoyable and quite an exotic experience, especially on the upper deck and cabin class, with good food in the canteen.

I remember an incident in about 1968, when a Branch Manager of SBI Panaji, Shri N.C.Chowhan (I was his steno) and PRO Shri Inacio.C. Viegas had gone aboard the ship anchored at Panaji port, to say good-bye to a valued VIP customer from Mumbai identified by Central Office. Sharp on time for departure, the gangmen had swung into action by removing the ropes from the moorings for the ship to leave at high tide. Gangway ladders were lifted. Slowly the distance between the ship and the dock bay was widening. Alarmed, the two had to decide instantly, two alternatives, either to disembark at the next port at Ratnagiri or jump now. They risked their lives in having a big jump from the ship's deck onto the Panaji dock berth. It was sheer luck and adventure.

The new proposal to start the sea service is to keep the tickets on par with the Railways. If the number of cabins are increased with the railway type cubicles, a large number of ship travellers will be able to afford to pay an average of Rs.1000/-, which is presently the cost of an AC bus seat. The Goa MPT has also plans to welcome more cruise liners, yacht services and sea plane services.

Our SBI pensioners desiring to enjoy and relax in Goa will now have access to steamer services, besides railways and buses. For them our Association has provided, as a welfare measure, SBI Pensioners' Holiday Home at Panaji, at rate Rs 200/- per bed per diem (total 3 rooms with 2 beds in each), Indian and western toilets, geyser, TV in reception hall, with gallery accessible from each room. On landing in Goa, they can book North and South Goa sightseeing tours to see silver sand beaches, enjoy a variety of eat-outs, events, theaters, art gallery, Museums, shopping, water sports, wellness clubs, world famous temples and heritage churches, sundown river cruises, spice farms etc.

Steamy steamer days are coming soon to you.

***Isac Hilario Dias***
Secretary, Panaji Zonal Sub-Centre

### चारोळी

हासूनी लाजलीस जेव्हा
कळले तुझ्या मनातले
पहिलीच भेट तुझीन् माझी
बोलती भाव तुझ्या नयनातले ॥

****

स्वप्नी माझ्या पुन: पुन: येशील का
गीत तेच गतजन्मीचे गाशील का
पाहीन वाट मी युगे न युगे
अंतराळीच्या कुण्या ग्रहावर
तू मज कधी भेटशील का?

– **बा. शं. बोरगावकर,** मिरज
भ्रमणध्वनी – ९१५८६७९८४

# RELIGION AND SPIRITUALITY

Some persons consider that spirituality and religion are almost the same. Religion invents practices, rituals and ways of life etc. Spirituality discovers the truth. In the process, religion divides people into various practitioners of ways of life. But spirituality finds common qualities of all the religions as variants of those common qualities.

Religion is determined by birth and influences the individual from the childhood. It is necessary to be in a religion in the beginning of life to get directions for how to live. Even children of an atheist learn the ways of life of the family of the atheist which are derived from the religion of the original family.

## MONISTIC RELIGIONS & HINDUISM

Major religions of the world viz. Christianity & Islam are monistic religions having one Prophet, one Holy book & one God. The oldest religion of the world is Hinduism which was originally known as Sanaatan Dharma i.e. ancient way of life based on do's & don'ts for righteous life with full freedom within the broad parameters.

Hindus have many spiritual books. Bhagavad Gita is the scripture which is the essence of ancient Vedas, Upanishads, Shrutis & Smritis. The Gita contains divine words emanated from the lips of God himself as recorded by the divine vision by the grace of Veda Vyas. For righteous Hindus God is one with many names; truth is one though there are many religions. They believe in non-violence. They have different practices & rituals due to freedom to practice the religion & some may not be regular visitors to temples or involved in any rituals. For some meditation only is the practice of religion.

## BUDDHISM

Buddhism is the religion of the followers of Gautam Buddha whom Hindus consider as an Avatar i.e incarnation of God. Lord Buddha did not mention about God perhaps to keep his followers free from false faith. Hence Buddhists do not conceptually acknowledge omniscient, omnipotent all pervading power i.e. God. Buddhist meditation (Vipassana) is a great gift to His followers, Hindus & enlightened persons of the other faiths.

## SPIRITUALITY

Spirituality enables the persons practicing it to find God in one's inner self. In fact, one of the spiritual techniques called as 'Soham' technique produces silent sound of 'soham' i.e. sahaaham meaning I am He. This helps identifying self with soul & not body and/or mind. Spirituality gives experience of finding God in inner self in this life.in the present, here & now. Spirituality is the search for the sacred.

## KARMA YOGA

Yoga means union with God & Karma Yoga is union with God when karma i.e. activity as matter of duty is performed without any expectation of fruits from it. In the Gita, Karma Yoga has been described in stanzas 39 to 53 of Chapter 2.Chapter 3 dwells fully on Karma Yoga & finally stanzas 56 to 66 of Chapter 18 contain final advice of Lord Krishna to Arjuna.

Swami Vivekananda in his book Karma Yoga has described Karma Yogi house-wife securing knowledge & wisdom as a devoted wife performing action without any expectation of fruits. A sanyasi meditating under a tree looked up when a bird shitted on his head & by his mere looks the bird died of burns. Thus happy with the powers gained by him, he proceeded for bhiksha (begging for livelihood) and came to the devoted housewife mentioned above. She asked him to wait as she was nursing her sickly husband. The Sanyasi felt that the housewife was ignorant of his powers when she asked him to wait. While giving alms she said I am not the bird which burnt by your angry looks. The Sanyasi begged

her to accept him as a disciple. She politely said, as a mere house wife, she was not capable of accepting him as a disciple & directed him to a butcher.

When he reached the butcher's shop, he was asked whether he was directed by the above mentioned lady. After completing his work, he takes the Sanyasi to his home & after nursing his elderly parents & taking bath engages in discussions about Karma Yoga. Impressed by the discussions the Sanyasi asked the butcher as to why he was performing inferior & bad work when he possessed such acknowledge. The Vyadha (Butcher) told him that no karma or action is bad or inferior if it is done faithfully. He was doing it faithfully as a source of livelihood taught to him by his father though he himself was vegetarian. The dialogue is on record as Vyadha Gita.

**OTHER YOGAS**

Chapter 2 of the Gita describes Sankhya Yoga (Gyana or Dhyana Yoga) i.e. Yoga of knowledge. Chapter 5 of the Gita mentions Dhyana Yoga or Yoga of meditation with devotion; this, I think, is Raja Yoga. Chapter 12 of Gita refers to Bhakti Yoga. Any of the yogas when practiced properly & with devotion & concentration leads to self-realisation. Role of Guru is quite important in getting guidance for self-realisation. There is difference between teachers & gurus; the teacher who guides the disciple for realizing. God is guru.

**WHY MULTIPLICITY of RELIGIONS**

All religions are basically for the spread of the same truth in different ways. But scriptures produced by saints, sages & prophets by their utterances in the high state of spiritualism are interpreted differently by the followers & that is the reason for multiplicity of religions. Bible states that 'Kingdom of God is within. This is not understood without being spiritual. Jainism & Sikhism are the religions of prophets born in Sanaatan Dharma.

**CONCLUSION**

Religions continue to teach contents of sacred books as perceived by the leaders & are based on beliefs, practices & cultural systems. Religion teaches fear of God. Spirituality is based on love of God & presence of God in every thing & everywhere. Religion has emphasis on outer form & rituals. Spirituality finds inner peace & happiness. Each religion has produced spiritual seekers.

(Note : I have used information from internet & mainly Google for benefit of the fellow pensioners)

***- S.V.Naik,*** Andheri (E), Mumbai - 400069 Cell # 098211.27616

## आता थोडं हसा....

सहा महिने मानसोपचार तज्ञाकडे उपचार घेतल्यावर सौ. शालिनीताई डॉक्टरांना म्हणाल्या, ‘‘खरं म्हणजे माझा मानसोपचार या विषयावर अजिबात विश्वास नाही.’’

मानसोपचार तज्ञ - ‘‘अहो, मग तुम्ही दर आठवड्याला १ तास व शिवाय माझी फी रू. ५००/- भरून कशासाठी उपचार घेत राहिलात?’’

सौ. शालिनीताई - त्याचं काय आहे डॉक्टर, मला माझ्याबद्दल बोलायला खूप खूप आवडते पण कुणी ऐकायलाच तयार नसते. तुम्ही मात्र सर्व काही किती शांतपणे ऐकून घेत होतात. म्हणून.

**- वसंत धुपकर,** पुणे

मो. - ९०४९०००४१३

स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या अनेक यशस्वी गृहप्रकल्पानंतर

# मेसर्स सुरेश घंगाळे अँड असोसिएट्स्

# योगेश कन्स्ट्रक्शन्स

सादर करीत आहे

## सुसगांव (बावधन-पाषाण जवळ)

**दोन रूमचे सुसज्ज, अत्याधुनिक ६० फ्लॅटचा प्रोजेक्ट**

**९०० ते १००० स्के. फूट**

**दर रु.४२००/- प्रति स्के.फूट फेज-१ साठी**

**५ गुंठे ते १० गुंठ्याचे प्लॉट**

**संपर्क**

**९३७१०१४८०७ / ७५०७८०६००७**

ऑफिस -
स.नं.९१/१
स्टेट बँक कॉलनी, रायगड बिल्डींग,
उत्सव हॉल जवळ, पौडरोड,
कोथरूड, पुणे - ४११०३८
वेळ - संध्या. ४ ते ८.००
रविवार व सुट्टीचे दिवस
सकाळी ११ ते १
फोन नं.०२०-२५३८०५०६

ऑफिस -
जी-१५,शांतीकुंज बिल्डींग,
जी.पी.ओ. समोर,
साधु वासवानी रोड, कॅम्प,
पुणे - ४११००१
फोन नं.०२०-२६१२२०२१

# ‘संवाद’ लेख स्पर्धा २०१३

## पुरुष विभाग – द्वितीय पारितोषिक विजेता लेख

## *नवी पिढी – संस्कारांची दिशा*

*वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटी समप्रभ ।*
*निर्विघ्नम् कुरु मे देव, सर्वकार्येषु सर्वदा ।।*

प्रथम कोणतेही चांगले कार्य सुरू करण्यापूर्वी श्री गणेशाचे वंदन करावे म्हणजे कार्य उत्तम होते असे संस्कार आमच्यावर ५०-६० वर्षांपूर्वी झाले होते. त्याचेच पडसाद म्हणून हा श्लोक लिहिला आहे. असे अनेक संस्कार मनात रुजले आहेत. ह्याला कारण त्या वेळचे वातावरण, परिस्थिती-एकत्र कुटुंब पद्धतीमुळे घरात वडिलधारी मंडळी असत. मुलांकडे त्यांचे बारीक लक्ष असे. लहान मुले ही कुंभार जसा घड्याला आकार देण्यासाठी मऊ माती घेऊन चाकावर फिरवतो तसेच संस्कारांनी घडत जाणारी मुले, पुढे विविध कसोट्यांनी ताऊन-सुलाखून खडतर जीवनाच्या भट्टीतून तयार होतात.

आज एकत्र कुटुंब पद्धती लोप पावली आहे. घरात ३/४ माणसे, महागाईचा भस्मासूर, जीवनमान उंचावलेले, त्यामुळे पती-पत्नी दोघांना दिवसभर अर्थार्जनासाठी घराबाहेर दूर जावे लागते. त्यामुळे शाळे व्यतिरिक्त वेळेत मुलांची संगोपन गृहात अथवा अन्य ठिकाणी सोईप्रमाणे व्यवस्था करावयाची, ह्या शिवाय आई-वडिलांकडे दुसरा पर्याय नसतो. काहींना रात्रपाळीमुळे, प्रवासामुळे जागत्या मुलांचे दर्शन कठीण होते. हे जाणूनच डॉ. सलिल व संदिपचे ‘दमलेल्या बाबाची कहाणी’ हे गीत खूप प्रसिद्ध झाले. कारण सर्वसाधारण बहुतेक पालकांचे हे मनोगत आहे. अशा परिस्थितीत नवीन पिढीवर संस्कार करणार कोण?

संस्कार म्हणजे बुद्धीवर प्रक्रिया होऊन मनावर व्यक्त आणि अव्यक्त होणारे सुपरिणाम. हे दक्षता पूर्वक-प्रयत्न करून रुजवावे लागतात. आपल्या शास्त्रात एकंदर विधिवत १६ संस्कार नमूद केले आहेत, पण त्यापैकी आपण जेमतेम ३-४ संस्कारांनी मुलांना संस्कारीतो. अशा संस्कारी झालेल्या मुलाचा दुसरा जन्म झाला आहे असे समजतो. त्या मुलास द्विज-ब्राह्मण असे ही समजले/संबोधिले जाते. कारण तो ज्ञान संपन्न झालेला असतो.

नवीन पिढी ही सकाळी उठल्यावर ‘कराग्रे वसते लक्ष्मी...’ ह्या श्लोकाने सुरुवात करीत नाही. त्यामुळे आपले हात किती शक्तिशाली आहेत ह्या सकारात्मक जाणिवेपासून वंचित राहते. तसेच सकाळी सूर्य नमस्कार, जोर-बैठकांनाही रामराम. त्यामुळे सूर्याप्रमाणे तेजस्वी, बांधेसूद, डौलदार शरीरयष्टी पासून खूप दूर. संध्याकाळचे संस्कार म्हणजे शुभंकरोती, रामरक्षा, परवचा, झोपताना गोष्ट हे शक्य नसल्यामुळे त्यापासून होणारे फायदे म्हणजे निर्भिडपण, उत्तम पाठांतर, स्पष्ट उच्चार आणि तात्पर्य असलेल्या प्रेरणादायक गोष्टी. ह्या सर्व संस्कारांपासून नवी पिढी खूप दूर राहिली आहे.

आज नव्या पिढीला एक पॉवरफुल ‘अस्त्र’ लाभले आहे. त्यामुळे आपण एकटे आहोत हे त्यांना जाणवतसुद्धा नाही. आई-वडील दूर आहेत ही परवणीच वाटते. ते जेव्हा-जेव्हा वेळ असतो तेव्हा त्याचे भोवती बैठक मारून बसतता. त्याला आमची पिढी ‘इडिअट बॉक्स’ असे संबोधिते. पण ह्या नवीन पिढीचे सर्वेसर्वा आहे असा ‘टी.व्ही.’ हा नवीन पिढीवर प्रभावी संस्काराचा माध्यम आहे. त्याचे प्रसारण कार्य, त्याची कार्यशाळा रात्रं-दिवस चालू असते. कोणीही-कोणत्याही वेळी कसेही येऊन बसा त्याचे कार्य चालूच राहते. तो इतका प्रभावी आहे की जर एखादी व्यक्ति अवेळी आली असता झालेल्या कार्यक्रमाचे पुन:प्रसारण करून उशीराबद्दल शिक्षा करीत नाही.

अशा टी.व्ही. द्वारे न संपणाऱ्या गोष्टीची मालिका निरनिराळ्या चॅनल वरून विविध भाषेत प्रसारित केली जाते. मालिकांत भांडणे, कट-कारस्थाने, सूड, बदला, खून, सत्तेचा हव्यास असा मसाला-युक्त कार्यक्रम असतो. ह्याचे परिणाम, त्याची शिकवण दुसरी कोणती बरे असणार!

हे टी.व्ही. सर्व प्रक्षेपण विनामूल्य करतात. त्याचा खर्च-व्यवसायिकांना नफा मिळणे जरूरीचे असते. ते समाज कार्य करीत नाहीत. त्यांचे उत्पन्नाचे दालन म्हणजे जाहिराती. त्यांचा भडिमार सतत चालूच असतो. ह्या जाहिरातींसाठी बाल कलाकारांना चांगलीच मागणी आहे. लहान मुले असल्याने मुले व वडिलधारी व्यक्ति त्या जाहिराती आवर्जून पाहतात. त्या जाहिरातीत लहान मुले फार हुशार दाखविली जातात. नव्हे अति हुशारी दृष्टीस पडते. ती आपल्या आई-वडिलांनाच काही कळत नाही व त्यांना ते ज्ञात आहे असे संवाद असतात. मुले उद्धट वागताना दाखवली जातात. आपण वडिलधाऱ्या व्यक्तिंना काही शिकवतो हीच प्रवृत्ती टी.व्ही. पाहणारा वर्ग आकलन करतो.

नव्या पिढीचे आकर्षण वाटण्याचे आणखीन एक फार आवडते कारण टी.व्हीमध्ये जवळ जवळ ८/१० चॅनल्स पोगो, कार्टून, नेटवर्क्स, निक, ॲनिमॅक्स अशा नावाने विविध कार्यक्रम सतत प्रसारित करतात. त्यामधील काही कॅरॅक्टर्स, पात्रे ही नव्या पिढीची फार मोठी आदर्शच आहेत. ते त्यांचे श्रद्धा स्थान बनले आहेत. उदा. हि मॅन, स्पायडर मॅन, बेन टेन, पावर पॉइंटची टोळी, छोटा भीम अशा अनेक व्यक्तिरेखा उपलब्ध आहेत. त्यांचे फोटो, फोटो असलेले कपडे, बॅग, बॉक्स,

पेन-पेन्सिलींचे, टिफीनचे, पाण्याची बाटली, एक नव्हे असे अनेक ठिकाणी त्याचे फोटो त्यांना स्फूर्ती देतात. ह्याबद्दल अधिक काय बोलणार! एवढेच नव्हे तर त्याला जोडीला टी.व्ही. गेम, मोबाईल गेमभोवती ते एकटेच बसून तासन्‌तास खेळतात. ह्याला काय बरे म्हणावयाचे?

एकच यंत्र नवीन पिढीवर संस्काराचे साम्राज्य चालवते आणि आपण आई-वडील/पालक त्याला नावे ठेवत दोष देत मुलांना ओरडत असतो. त्यांनी होणारे संस्कार-नव्हे कुसंस्कार कमी होतील का? त्यांची आवड, करमणूक, वेळ घालवायचे साधन असे बहुपयोगी 'अस्त्र' ते टाकून देतील का? उत्तरे नाहीच मिळणार. अशा वेळी पालकांची जबाबदारी वेळ नसला तरी अथवा वेळ मिळेल तेव्हा आपली वागण्याची दिशा बदलून पाहावी. काही चांगले फळ प्राप्त होते का ह्या सर्वत्र पसरलेल्या टी.व्ही. नामक वृक्षापासून. त्यासाठी आपण आपल्यात बदल घडवून आणणे जरुरीचे आहे. संस्काराची कार्यपद्धती बदलली पाहिजे. खाली नमूद केलेल्या गोष्टी आपण अंमलात आणल्या तर त्याचे पासून होणारे नुकसान टाळले तरी एक प्रकारे तो फायदाच असेल. आपण वागावयाची पद्धत दिशा चांगलेच निष्पन्न करील अशी खात्री आहे.

१) पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या पिढीचा संभाषणाचा मार्गच बंद आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. आपण मुलांजवळ संभाषण करीत नाही. त्यांचेवर प्रश्नांचा भडीमार करतो. सूचना देतो. सल्ले देतो. हा प्रकार थांबविणे फार महत्त्वाचे-जरूरीचे आहे.

२) पूर्वी म्हणत की मुलांना आपल्या आई-वडिलांची चप्पल येऊ लागली की त्यांना मित्रासारखे वागवावे. आता चप्पल येईपर्यंत न थांबता मुलांना लहानपणापासूनच मित्रत्वाच्या नात्याने वागवावे. त्यांना आपण मित्रासारखे जवळचे वाटणे जरूरीचे आहे. त्यांचे मनोगत जाणून घ्यावे. ते आपले मनोगत आपल्या जवळच्या मित्राजवळच मोकळे करतात. ते समजले असता ते अयोग्य असेल तर न ओरडता, रागावता, प्रेमाने- समजून त्यात कोणत्या गोष्टी अयोग्य आहेत हे पटवून द्यायचे.

३) मुले संपूर्ण दिवसभरात अथवा रात्री आपण येईपर्यंत काय करतात हे खरे सांगतील जेव्हा तुम्ही त्यांचा विश्वास संपादन कराल.

४) मुलांच्या कृतीवर शेरे मारू नका. दोष देऊ नका. दोष आढळले असता ते त्यांना समजेल अशा शब्दात, प्रेमाने, त्यापासून होणाऱ्या तोट्याचा-नुकसानीचा हिशोब मांडा व त्याला परावृत्त करा.

५) घरी आल्यावर मुलांनी होमवर्क केला नाही, प्रोजेक्ट अपूर्ण राहीला, मार्क कमी पडले, अथवा नापास झाला ह्या सर्व गोष्टीमुळे घरचे वातावरण पूर्णपणे बदलते. एका युद्धाचे, वादळाचे वातावरण तयार होते. अबोला होतो. त्यातून निष्पन्न काहीच होत नाही. अशावेळी आपण शांत बसून वातावरण खेळीमेळीचं तयार केले पाहिजे. मुलाला बोलते केले पाहिजे. त्याच्या अडचणी जाणून घेतल्या पाहिजेत. संवाद साधला पाहिजे. त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. तर त्याच्यात बदल घडून येईल.

६) मुले हट्टी असतात. ऐकत नाहीत. त्यांना 'स्टबर्न' म्हणून संबोधिले जाते. अशा वेळी दोन पर्याय असतात. एक हट्ट पुरवावयाचा किंवा शिक्षा करावयाची. पालकांनी हट्ट आणि लाड ह्याची गल्लत करू नये. मुलांनी काय केले पाहिजे ह्याची स्पष्ट कल्पना द्यावी. काय करू नये हे स्पष्ट करावे.

७) मुले सतत टी.व्ही. गेम/मोबाईल गेम खेळत असताना त्यांना त्या खेळाची माहिती विचारून घ्यावी. एकंदर किती गेम आहेत. त्यातील काही गेम आपण शिकून घ्याव्यात. त्यांना न आवडणारे गेम जाणून त्यांची आवड निर्माण करावी. त्या-त्या गेममधील फरक कोणता हे समजावून सांगून त्याचा स्पिड, स्कोअर, त्यातील प्राविण्य प्राप्त करण्यात उत्तेजन द्यावे. तिच गोष्ट कार्टून फिल्मची. त्याचे कथानक मॉरल वगैरे विचारून घ्यावेत आणि त्यासाठी कमी वेळ देत जा हे समजावून सांगितले असता मुले ऐकतात.

८) एखादी गोष्ट आपण सांगितली असता ती का करावयाची ह्याचे कारण शास्त्रोक्त पद्धतीने पटवून देऊन ती का नवीन पिढीला जरूरीचे आहे हे पण समजवावे. उदाहरण द्यावयाचे ते एका इंजिनिअर झालेल्या मुलाला खूप प्रयत्न करूनही नोकरी लागत नव्हती. तो खूप नर्व्हस झाला होता. त्याचा एक मित्र त्याला एका ज्योतिषाकडे घेऊन गेला. त्याने त्याला एक व्रत सांगितले. रोज सकाळी आंघोळ करून तांब्याभर पाणी घेऊन वडाच्या झाडास घालावयाचे, दिवा लावावयाचा आणि ११ प्रदक्षिणा घालावयाच्या अनवाणी पायानं, असे २१ दिवस कर म्हणजे तुला नोकरी लागेल. त्याने हे सर्व केले. आश्चर्य असे की त्याला ताबडतोब नोकरी मिळाली. पण त्या मुलाला प्रश्न पडला की, हे कसे शक्य झाले. त्याने त्या ज्योतिषाला कारण विचारले, पण तो म्हणाला, 'हा मार्ग माझे वडिलांनी लिहून ठेवला होता तो तुला सांगितला. मी ह्यामागील शास्त्रीय कारण चौकशी करून सांगतो. तो मुलगा त्याचा पाठपुरावा करीत होता. काही दिवसांनी त्यांनी सांगितले ते असे - शुचिर्भूत होऊन दिवा झाडाजवळ लावला असता तेथील काळोख दूर होतो, प्रसन्न वाटते. पाणी झाडाच्या बुंध्याजवळ घातले असता परिसर निर्मळ होतो. वडाच्या झाडाच्या सर्वत्र

खोलवर पसरलेल्या मुळांच्या आधारे त्या मुळांची नकारात्मक ऊर्जा प्रदक्षिणा घालताना झाड, मुळांच्या आधारे ओढून घेते- असे २१ दिवस केल्याने, त्या मुळांची नकारात्मक ऊर्जा जाऊन तो प्रसन्न होतो आणि मुळांत अव्यक्त बदल घडून येतात. ते नोकरी प्राप्त होण्यास सहाय्य करतात. हे उत्तर ऐकून मुलाचे समाधान झाले. अशी नव्या पिढीची अपेक्षा असते.

नव्या पिढीसमोर वेगवेगळे प्रश्न आहेत, त्यांचे विश्व वेगळे आहे. सद्य परिस्थितीत अनुरुप असे संस्कारांचे पुनरुज्जीवन होणे जरुरीचे आहे. हे वैज्ञानिक संशोधनाइतकेच महत्त्वाचे आहे. पण मला वाटते की, 'संवाद'चे ब्रीद वाक्य देखील विचार करण्यासारखे, नव्हे अंगिकारण्यासारखे आहे.

''मना-मनांचा मेळ जुळावा । द्वेशाचा लवलेश नसावा ।
सादासी-प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।

- **विनोद अनंत रणदिवे**, बोरिवली, मुंबई
भ्रमणध्वनी - ९७५७२९८८८१

## शोधू कुठे?

शोधितो मी भव्य क्षितिजा, कुठे कुठे आहेस तू
चारी दिशातून वेध घेतो, आहेस कुठे सांग तू

बोल पवना पर्जन्या लपला कुठे आहेस तू
आसमंती सर्वव्यापी खचितची आहेस तू

तृप्त करण्या सृष्टीला पर्जन्यवृष्टी करिशी तू
सरितांसवे एकवटुनी सागरा बिलगशी तू

तेजोनिधी भास्करा रे नित्यनेमे प्रकट तू
संजीवन धरतीस देण्या किती किती उदार तू

हिमशिखरात अश्वथाम्या का असा अदृश्य तू
कोणाही एका मानवाला, भेटला नाहीस तू

राऊळीचा मंदिराचा, निवासी रहिवासी तू
भक्तांप्रती मूर्तीरूपी, निश्चल दिसतोय तू

देव आहे, देव नाही, माणसा म्हणतोस तू
एक अनामिक शक्ती आहे म्हणूनीच जगतोस तू

उमजेल का कधी माणसाला चमत्कार हा तुझा
सांग तूच, शोधू कुठे, ठाव घेवू कसा तुझा?

- **प्रभाकर कानिटकर**, कोल्हापूर
भ्रमणध्वनी - ९८८११९९१९९

## गरज आपलीच

मोलकरणीशी जुळले नाते
रोजच तिची वाट पाहते ।
कारण-गरज आपलीच ।।१।।

आली, आली मोलकरीण आली
अन् प्रतीक्षा संपली
आली तशी फतकल मारून बसली
गरम चहा, नाश्त्याची फर्माइश केली
केली तर केली गरज आपलीच ।।२।।

सगळीकडच्या ताज्या बातम्या
जणू काही न्यूज चॅनेल्स
कोण गेलं, कोण आलं, कुणाचं भांडण तर
कुणाचं प्रेमप्रकरण सांगू लागली
लागली तर लागली गरज आपलीच ।।३।।

एकदाची उठली अन् कामाला लागली
एक फटका इकडे तर दूसरा तिकडे
झटक्यात सफाई संपली
संपली तर संपली, गरज आपलीच ।।४।।

भांडी घेतली घासायला, आवाज लागला घुमायला
अर्धे खरकटे, अर्धी राख
म्हणते कशी बाई भांडी ठेवत जा साफ
म्हटली तर म्हटली गरज आपलीच ।।५।।

धुण्याला लावला हात, कपड्यांवर मारली थाप
पाण्यात टाकली अन् वाळत घातली
घातली तर घातली गरज आपलीच ।।६।।

लादी घेतली पुसायला, सूचना लागली द्यायला
सर्फ, फिनाइल, गरम पाणी, नवीन कपडा समदं द्या
एक फडका अलीकडे तर दुसरा पलीकडे
कशी बशी पुसली
पुसली तर पुसली - गरज आपलीच ।।७।।

मोलकरणीशिवाय मी अधुरी, फरमाईश करते पुरी
तिला हात धुवायला, लिक्विड सोप तर
पुसायला नॅपकीन दिली
दिली तर दिली - गरज आपलीच ।।८।।

बाई, समंद स्वच्छ करून ठेवा. मी येते वेळेला.
जाता जाता दम देवून गेली कारण गरज आपलीच

- **संध्या प्रितम परदेशी,** औरंगाबाद
मो. - ९३२५२१८१२२

# 'संवाद' लेख स्पर्धा २०१३

### स्त्री विभाग – द्वितीय पारितोषिक विजेता लेख

## आजी आजोबा–अपेक्षा व उपेक्षा

''दूधापेक्षा दूधाची साय जशी जास्त गोड लागते'' तसेच आजीआजोबांना मुलांपेक्षा नातवंडे जास्त प्रिय असतात. आईबाबानंतर आजीआजोबा होणे म्हणजे त्यांची पदोन्नतीच असते आणि त्याचा आनंद अवर्णनीय असतो.

आजीआजोबा-अपेक्षा व उपेक्षा ही स्पर्धा जेव्हा जाहीर झाली आणि विषयात उल्लेखिले नसले तरी आजीआजोबांच्या अपेक्षा व उपेक्षा, तसेच आजीआजोबांकडून, नातवंडांच्या अपेक्षा-उपेक्षा असे दोन्ही पक्षातर्फे लिहिण्याचे ठरविले.

माझ्या सासूबाई दीरांकडे घाटकोपरला राहतात. मला १७ ऑक्टोबर १९८१ रोजी मुलगा झाला. सासूबाईंना नातू झाला म्हणून आकाश ठेंगणे झाल्यासारखे वाटले. दीर-नणंदाना सांगितले, ''आता मी तीन महिने मुलुंडहून हलणार नाही.'' मला नातू झाला आहे.'' नातवाला न्हाऊमाखू घालण्यात, त्याच्यासाठी घराच्या स्वच्छतेकडे जातीनिशी लक्ष, नातवाशी बोबडे बोबडे बोलण्यात, बाळंतीणीचे-सूनेचे लाड करण्यात, दिवस कसा सरे, त्यांचे त्यांना कळायचे नाही. आम्हीही बारशाच्या दिवशी सोन्याची फुले सासूबाईंवर उधळली, आजी अगदी धन्य झाल्या.

आजींना वाटते, नातवंडांना सर्दी होऊ नये म्हणून छान ओव्याची धुरी द्यावी, स्वत: काजळ करून त्यांच्या डोळ्यात घालावे. परंतु आजच्या नवीन पिढीला ते रूचत नाही. डॉक्टरांनी धुरी देण्यास व डोळ्यात काजळ घालू नका, अशी सबब पुढे करून आजीला नाखूष करतात. आजी एका कोपऱ्यात बसून निमूटपणे टिपे गाळीत बसते, हिरमुसली होते, अशा उपेक्षांनी.

नातवंडे मोठी होतात तसे आजोबांना त्यांना शाळेत घेऊन जाणे व शाळेतून आणणे, अशी ड्यूटीच लागते मुलांकडून. पण हे नुसते कर्तव्य म्हणून ते करीत नाहीत, तर त्यात ओतप्रोत प्रेम, आपुलकी, जिव्हाळा ओथंबलेला असतो. आजोबा नातवाशी क्रिकेट, टेबलटेनिस, बॅडमिंटन खेळतात. घरातल्या घरात कॅरम खेळतात, त्यांच्याबरोबर खोटेखोटे हरण्यात सुद्धा त्यांना धन्यता वाटते. त्यांच्या आवडीची गोष्टीची किंवा विज्ञानाची पुस्तके आणून देतात.

आपलीच नातवंडे किती हुशार, सरस आहेत. हे संध्याकाळी 'आजोबांच्या कट्ट्यावर' सांगताना चढाओढ लागते, अभिमानाने ऊर भरून येतो. पण एखादे आजोबा गप्प असतात, खिन्नपणे बसून असतात. कारण त्यांची नातवंडे त्यांच्याजवळ नसतात, परदेशी असतात. क्वचित मुलाने फोन केल्यास 'हाय ग्रँडपा' असे बोल कानावर पडतात व त्यातच त्यांना समाधान मानावे लागते. आपली नातवंडे इकडे येऊन आपल्याला बिलगतील, घट्ट मिठी मारतील अशा अपेक्षेत असलेले आजी आजोबा, एखाद्या समारंभाचे फोटो किंवा सीडी पाहूनच, डोळ्यातील अश्रू लपवित, मुले नातवंडे भेटल्याचे खोटे समाधान, आनंद त्यांना चेहऱ्यावर दाखवावा लागतो. कधीकधी मुले नातवंडे येथे येणार, ही बातमी कानी पडताच, त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू होते. त्यांना आल्यावर कुठे ठेवू, कुठे नको असे होऊन जाते. त्यांच्या आवडीचे पदार्थ केले जातात आणि नंतर त्यांच्या येण्याचा बेत रद्द झाला असे कळते. तेव्हा आजीआजोबांची मानसिक स्थिती दयनीय होते, हातपायच गळून जातात त्यांचे. हा अपेक्षाभंग ते सहनच करू शकत नाहीत.

नातवंडांना भेटायला का आणत नाहीत, म्हणून मुलगा--सून यांच्याबरोबर वादविवाद होतात. परंतु मन त्यांचे माया-ममतेने ओथंबलेले असते.

नातवंडे मोठी होतात. त्यांना वाटते आपल्या आजीआजोबांनी आराम करावा. लवकर उठू नये व आपण ऑफिसात जाण्याच्या वेळेला त्यांनी सकाळच्या वेळी मधे मधे लुडबुड करू नये. वयोमानाप्रमाणे झोप कमी झालेली, एवढ्या वर्षांची लवकर उठण्याची सवय, कसे ते नव्या पिढीप्रमाणे गादीवर नुसते लोळत पडणार?

त्यामुळे मुले-नातवंडे जरी काही बोलली तरी थोडे दुर्लक्ष. थोडेसे हिरमुसले होऊन, दुसऱ्या दिवशी परत लुडबुड करण्यास सज्ज असतात. नातवंडांनी मोठ्या माणसांचा मान राखावा. कोणाचा उपमर्द करू नये, संस्कार सोडू नयेत. अशा माफक अपेक्षा असतात आजीआजोबांच्या! आपल्याला खूप पैसे द्यावेत, उंची कपडे आणावेत अशा फोल अपेक्षा ते न ठेवता एकमेकांचा सहवास, एकमेकांवरील प्रेम, हाच त्यांचा अमूल्य ठेवा असतो.

माझ्या मुलाने आजीला ५-६ वर्षापूर्वी अमेरिकेहून टोपी असलेला स्वेटर आणला. आजही तोच स्वेटर दिमाखात घालून परत परत 'माझ्या नातवाने मला अमेरिकेहून स्वेटर आणला'', असे अभिमानाने सर्वांना सांगतात. नातसुनेचेही त्यांना तेवढेच कौतुक! गेल्या महिन्यात आम्ही त्यांना दुबईला घेऊन गेलो. कारण नातीकडे जाण्यास एका पायावर तयार झाल्या. २० मार्चला त्यांचा ८८ वा वाढदिवस नातीने व नातजावयाने घरी मोठा केक आणून, औक्षण करून, नंतर संध्याकाळी क्रूसवर दोन तास फेरी, जेवण खाण सर्व तेथेच, खूप छान साजरा

केला. युरोपियन, अमेरिकन स्त्रियांनी सुद्धा त्यांच्यासोबत फोटो काढले. आजींना अगदी भरून आले. नातीला ''तुझा संसार, नातजावयांचे प्रेम, पतवंडे पाहून मला अगदी कृतकृत्य झाल्यासारखे वाटले'', म्हणाल्या.

मानसी माझी मुलगी, तिला दोन मुलगे तेज व आदित्य. तेज नावाप्रमाणेच तेज आहे. आम्ही दुबईला गेलो तेव्हा त्याची परीक्षा चालू होती. मी इंग्रजी, हिन्दी व गणिताचा अभ्यास घेतला. परीक्षेहून आल्यावर तेज म्हणाला, ''आजी तू येथेच राहा, इंडियाला जाऊ नकोस, ''मी म्हटले का रे? तर म्हणतो, ''तू बेस्ट चिटर आहेस.'' त्याला बेस्ट 'टिचर' म्हणायचे होते. हसून हसून पुरेवाट पण हेच चिटर दुसऱ्या एखाद्या व्यक्तिने म्हटले असते, तर मला खूप राग आला असता. पण नातवाने म्हटले, ''दूधावरची साय'' मग काय बोलणे आवडणारच. तोच मला सांगायचा, ''आजी तुम्हीच आईला शिकविले ना? खायचे-प्यायचे लाड. अभ्यासाचे लाड नाही. आज माझा नातू तेज, हा दुबईला अरेबिक भाषेत सर्व वर्गात पैकीच्या पैकी गुण मिळवून पहिला आला आहे. ॲबॅकसमध्ये सातव्या लेवलची परीक्षा, तिसरीत असताना पास झाला. कॉम्प्युटरमधय्ये मास्टर आहे. आजोबांनी आणून दिलेल्या सर्व पुस्तकांचा वाचून फडशा पाडला. अशी नातवंडे, असे त्यांनी जोपासलेले संस्कार पाहून, जीवनाचे सार्थक झाल्याचे वाटते.

पण सर्वच आजीआजोबांच्या अपेक्षा सफल होतात असे नाही. एकत्र कुटुंब पद्धती बंद झाली त्यामुळे नाती विखुरली गेली. जागेच्या अभावी किंवा मुलांच्या आर्थिक समस्येमुळे काही आजीआजोबांना वृद्धाश्रमाचा आश्रय घ्यावा लागतो. तेथे कोठे मिळणार नातवंडांचे प्रेम? दिवस बदलले म्हणून मनातल्या मनात कुढत राहावे लागते. सर्व स्वप्न, अपेक्षा भंग पावल्यासारखे वाटतात. मनोमनी खिन्न होतात. आजीआजोबा! ''कालाय तस्मै नम:'' म्हणून गप्प बसतात.

चिमुकल्या नातवंडांचा ऊबदार स्पर्श, त्यांचे बिलगणे, छोट्या छोट्या बोटांनी, हाताला धरून आपल्याबरोबर बागेत येणे, शाळेत येणे, त्यांची शिक्षणातील प्रगती पाहून अभिमान वाटणे, किती नैसर्गिक आहे ना हे! असे आजीआजोबा ज्यांना आपल्या नातवंडांचा सुखाचा संसारही पाहिला मिळतो, ते अगदी धन्य आहेत.

खरंच आजीआजोबा व नातवंडे यांना एकमेकांचा सहवास, प्रेम लाभणे म्हणजे भाग्यच होय!

**- सौ. सुप्रिया गोपाल कुलकर्णी, मुंबई**

भ्रमणध्वनी - ९९३०१२४७७७

# आई

आयुष्याच्या त्या वळणावर निघून गेली आई
वळण ठरले मग जीवघेणे, आता नाही मजला आई
बालपणापासून तर तुझ्या समजवण्यापर्यंत सर्वच आठवून गेले
अन आता मात्र न समजून घेण्यापायी तडजोडीने राहणे आले
तेव्हाची तू अन आताची ही, असती ना दोन जवळची नाती, आई
आयुष्याच्या त्या वळणावर.......

कधी म्हणायचीस तू मला बोलविले तुम्ही
ती आल्यावर कसे वागाल सांगा तुम्ही?
सगळेच ते आठवून गेले आता जीवन जगताना आई।
आयुष्याच्या त्या वळणावर.......

पूर्वायुष्य जात असते प्रत्येकाचे आईच्या सान्निध्यात
नंतर मग ही प्रवेश करते त्याच्या जीवनसंसारात
फरक आईबाबातला जाणवतो, सलतो मग प्रत्येकालाच आई
आयुष्याच्या त्या वळणावर.......

म्हणूनच जीवनात आई एकमेवच असते
पदोपदी म्हणूनच आई मुखातून निघत असते
ज्यांना नसते आई, त्यांनी काय म्हणावे आई?
आयुष्याच्या त्या वळणावर.......

**- रमेश इंगोलीकर,**
अमरावती

संपादक - लेखकास
(टाळण्याच्या उद्देशाने)

''तुमच्या कथा तशा बऱ्या असतात, पण तुमचे हस्ताक्षर काही नीट वाचता येत नाही. तुम्ही त्या टाईप करून का नाही आणीत?

लेखक - अहो मला टाईपिंग येत असते तर मी कशाला कथा लिहिण्याच्या भानगडीत पडलो असतो?

**- वसंत धुपकर,** पुणे
मो. - ९०४९०००४१३

लघुकथा

# दुष्काळ दुष्काळ....

कोरडेवाडीचे आमदार श्री. जगतराव (अप्पा) पाटील बऱ्याच दिवसानंतर मुंबई सोडून आपल्या विधानसभा मतदार संघाकडे फिरकले. डिसेंबरचा महिना, रात्री वाड्यावर निवडक कार्यकर्त्यांची बैठक झाली. रंगीत-संगीत पार्टी चालू झाली. गप्पांना चांगलाच ऊत आला. पुढील वर्षी होणाऱ्या निवडणूकीचा विषय निघाला. कोरडेवाडी पंचायत समितीचे सभासद व सभापती श्री. श्रीपतराव जाधवही पार्टीला हजर होते. श्री. जाधवही आमदारपदाचे तिकीट मिळविण्यासाठी मोर्चे बांधणी करीत आहेत असे जगतरावांच्या कानावर आले होते, पण तसे ते दाखवित नव्हते. पार्टीत मात्र दोघंही एकमेकांचे ग्लास आग्रहाने भरत होते.

पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीपूर्वी मतदार संघात काहीतरी भरीव असा जंगी कार्यक्रम आखला पाहिजे असे कार्यकर्त्यांचे मत पडले, पण जनतेसाठी काय करावे म्हणजे पुन्हा जगतराव निवडून येतील याबद्दल बराच खल झाला.

श्री. जगतराव यांना येत्या मे महिन्यात वयाला ६० वर्षे पूर्ण होत आहेत, असे कोणातरी कार्यकर्त्याच्या लक्षात आले व जगतरावांची एकसष्टी दणक्यात साजरी करावी व त्या निमित्ताने एक जंगी समारंभ घडवून आणावा असे ठरले.

श्रीपतराव पंचायत समितीचे सभासद असल्याने व ते सतत तालुक्यात हजर राहत असल्याने,एकसष्टी समारंभाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी आपल्या अंगावर घेतली व कार्याची आखणी सुरू झाली. अनेकांनी अनेक सूचना केल्या, शेवटी त्यासंबंधी एक यादीच तयार झाली ती अशी.

१. संपूर्ण तालुक्यात म्हणजे मतदार संघात जगतरावांचा पूर्ण व त्या त्या भागातील कार्यकर्त्यांच्या फक्त चेहरा असलेले फ्लेक्सचे बोर्ड १५ दिवस आधी कोपऱ्या कोपऱ्यावर लावणे २. ६१ सुवासिनींनी (शक्य तो तरुण) जगतरावांना ओवाळणे ३. बुंदीच्या लाडवांनी त्यांची तुला करणे. जगतरावांचे वजन साधारणपणे ८०-८५ किलो असल्याने १०० किलो लाडवांची व्यवस्था करणे. ४. तालुक्यातील सर्व सरपंचांनी जगतरावांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करणे. ५. सत्कार समारंभाच्या खर्चाचा वाटा जगतरावांनी काढलेल्या शिक्षण संस्थेतील शाळा मास्तर व सहकारी संस्थेतील कर्मचारी यांच्या एक दिवसाच्या पगारातून गोळा करणे ६. जमल्यास १/२ ज्येष्ठ मंत्र्यांना प्रमुख पाहुणे बोलावून त्यांच्या हस्ते सत्कार व (न) केलेल्या कामाचा गौरव करवून घेणे. ७. रात्री गावजेवण.

गावजेवण संपल्यावर रात्री सर्व निवडक कार्यकर्त्यांसाठी वाड्यावर खाण्यापिण्याचा 'स्पेशल' कार्यक्रम, सोबत जमल्यास नारायणगावाहून एखाद्या लावणी सम्राज्ञीचा लावणी नृत्याचा कार्यक्रम. केवळ लोककलेला उत्तेजन देण्याच्या हेतूने ठेवावा असे ठरले. सर्व कार्यक्रमाचे व्हीडिओ शूटिंग, वार्ताहर, टी.व्ही. वार्ताहर या सर्वांना बोलावून त्यांची योग्य ती बडदास्त ठेवून, जास्तीत जास्त प्रसिद्धी करावी असेही ठरले.

सर्व कार्यकर्त्यांना कामाला लावून जगतरावांनी दुसऱ्या दिवशी मुंबईकडे प्रस्थान ठेवले. त्यांचे डोळ्यासमोर ६१ चा समारंभ सोहळा दिसू लागला व नंतर येणाऱ्या निवडणूकीचे मिळणारे तिकीटही दिसू लागले.

जानेवारी संपला आणि फेब्रुवारीतच महाराष्ट्राच्या विविध भागातून विशेषत: विदर्भ, खानदेश, मराठवाडा या भागातून दुष्काळाच्या, पाणी टंचाईच्या बातम्या येऊ लागल्या. मंत्र्यांच्या बैठका होऊ लागल्या. दुष्काळी कामे काढण्यासाठी लगबग सुरू झाली. दुष्काळी तालुक्यांची नावे वर्तमानपत्रात झळकू लागली. त्यातच लग्नसराई सुरू झाली. दुष्काळ असूनसुद्धा मंत्री व पुढारी वर्गाच्या मुला-मुलींची लग्ने मोठ्या डामडौलात पुणे-मुंबईत होऊ लागली. त्यावर पाण्यासारखा पैसा खर्च होऊ लागला. त्यावर वर्तमानपत्रे व टी.व्ही. वाल्यांनी झोड उठविली, तेव्हा पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या त्यांच्या अनुयायांना झापण्यास सुरुवात केली. दुष्काळ लक्षात घेऊन सर्व खाजगी सरकारी समारंभ कुठलाही गाजावाजा न करता साधेपणाने साजरे करावेत असे फर्मान जारी केले. त्यात जगतराव पाटलांचा समारंभ बारगळण्याची लक्षणे दिसू लागली. कार्यकर्ते नाराज दिसू लागले. त्यांचा विरस होऊ लागला.

कार्यकर्त्यांना नाराज करणे म्हणजे पुढच्या निवडणुकीत हार पत्करणे. काय करावे? कसे करावे? या द्वंद्वात जगतराव सापडले. दोनदा आमदारकी पदरात पडलीच आहे. पण आता तिसऱ्यांदा जर निवडून आलो तर मंत्रीपदावर हक्क दाखविता येईल.

शेवटी कोणताही गाजावाजा न करता निवडक अशा कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत फक्त वाड्यावर कार्यक्रम करण्याचे ठरले. एकसष्टी आयुष्यात एकदाच येते, दुष्काळ तर दर ३-४ वर्षातून हजेरी लावीतच असतो, त्याचा एवढा बाऊ करण्याचे कारण काय? सगळी व्यवस्था श्रीपतराव जाधवांकडे होती, त्यांनी सर्व समारंभाचे व्हीडिओ शुटिंग व्यवस्थित स्वत: मागे मागे राहून करून घेतले. आपल्या विश्वासातील वार्ताहराला जगतरावांची मुलाखत जगतराव पिऊन टाईट झाल्यावर घ्यायला लावली.

मुलाखतीत काही उत्तरे जगतरावांनी मनातच ठेवली. ती कंसात दिली आहेत.

वार्ताहर : आपण गेल्या १० वर्षांपासून आमदार आहात. त्यापूर्वी आपण एका पतपेढीत साधे कारकून होता. १० वर्षात आपल्या संपत्तीत लक्षणीय वाढ झालेली आहे असे आपले विरोधक म्हणतात.

ज. पा. : (हरामखोर आहेत ते) माझा खर्च खूप कमी आहे. माझी राहणी अत्यंत साधी आहे. बापूजी म्हणजे म. गांधी माझे आदर्श आहेत.

वार्ताहर : आपले पहिले लग्न झालेले असताना सहा वर्षांपूर्वी आपण पुन्हा दुसरे लग्न केले असं म्हणतात.

ज. पा. : अहो, त्याला कारण हा दुष्काळच. एकदा दुष्काळी कामांची पाहणी करीत असताना तेथे उन्हा-तान्हात काम करताना मी तिला पाहिले. मला तिची फार दया आली. (खरं म्हणजे ती माझ्या मनात भरली.) म्हणून मी तिच्याशी लग्न केले.

वार्ताहर : याला आपल्या पहिल्या पत्नीने विरोध केला नाही?

ज. पा. : केला ना! पण मी तिची समजूत काढली. (चांगली बदडून काढली होती व जीवे मारण्याची भीती घातली.) आणि ती समजूतदार असल्याने तिची समजूत पटली.

पत्रकार : मग आपण आता दोघींबरोबर एकत्र राहता?

ज. पा. : छे छे ! पहिलीला पुण्यात बंगला बांधून दिला. दुसरी माझे सोबत मुंबईला असते. सोलापूरकडे मतदार संघात जाताना-येताना पुण्यात मुक्काम करावाच लागतो.

पत्रकार : आपण लागोपाठ दोन वेळा निवडून आलात. आपल्या या यशाचं श्रेय आपण कोणाला द्याल?

ज. पा. : दुष्काळाला. म्हणजे माझ्या मतदार संघात दर ३-४ वर्षात दुष्काळ पडत असतो. दुष्काळी कामांचे वाटप आमच्या कार्यकर्त्यांनाच मिळेल हे मी पाहतो. सरकारकडून आलेले अनुदान- मदत, निधी हे सर्व वाटप माझ्या देखरेखीखाली होते. कार्यकर्त्यांना कामाचे कंत्राट मिळते मग ते मला निवडून आणण्यासाठी जीव तोडून कामं करतात. (वेळ प्रसंगी विरोधकांशी हाणामारीही करतात.)

पत्रकार : यंदाच्या दुष्काळा संबंधी आपल्या सरकारचे धोरण काय आहे?

ज. पा. : त्यासाठी आम्ही जिल्ह्यातील सर्व नेते, मुख्यमंत्र्यांच्या भेटीस गेलो होतो. आम्ही ५०० कोटींचे पॅकेज मागितले आहे. ते १०० कोटी देऊ म्हणतात, पण आम्ही ऐकणार नाही. आम्ही दिल्लीला हाय कमांडकडे मुख्य मंत्र्यांविरुद्ध निवेदन देणार आहोत.

पत्रकार : आपली मागणी मान्य नाही झाली तर?

ज. पा. : आम्ही राजिनामा पत्रे तयार ठेवली आहेत.

(हाय कमांडने तंबी दिली की, सर्व राजीनामा पत्रे फाडून टाकू.)

बरंय! आता ही मुलाखत संपवू या. सर्व पुण्या-मुंबईच्या पेपरातून ही छापा, नि फोटा-बिटो टाका बरं का. नंतर मुंबईत भेटा. आमची पी.ए. फोन करेलच तुम्हाला. मग आपण निवांत बसू. काय? (म्हणजे निवांतपणे खाऊ आणि पिऊ)

तिसऱ्या दिवशी ज.पां.ची मुलाखत सर्व प्रमुख वर्तमानपत्रात छापून आली.

सहा महिन्यानंतर तिकीट वाटपात कोरडेवाडीचे तिकीट श्रीपतराव जाधव यांना मिळाले. ज.पां.चे तिकीट कापले गेले. त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे धाव घेतली. त्यांना पक्षश्रेष्ठींनी एकसष्टीची सीडी दाखवून जाब विचारला. पक्षादेश न पाळल्याबद्दल शिक्षा दिली. शेवटी ज.पां.नी मला नाहीतर माझ्या बायकोला तिकीट द्या, अशी विनवणी केली. तेव्हा पक्षश्रेष्ठींनी कोणत्या बायकोला? पुण्याच्या का मुंबईच्या? असे विचारून निरुत्तर केले. चला कामाला लागा व श्रीपतराव जाधवांना निवडून येण्यासाठी मदत करा, असे सांगून पक्षश्रेष्ठींनी भेट संपविली.

**- वसंत धुपकर**


मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स सहली

राजगुरु टुर्स

जिव्हाळा जपणारी माणसं...

| | | |
|---|---|---|
| केरळ बॅकवॉटर्स AC | 9 दि. | 16975/- |
| राजस्थान-मेवाड/मारवाड AC | 10 दि. | 18975/- |
| हैद्राबाद-रामोजी-श्रीशैल्य | 8 दि. | 12975/- |
| सोमनाथ-द्वारका-गिरनार | 8 दि. | 11975/- |
| स्पेशल मध्यप्रदेश | 13 दि. | 26975/- |
| दुबई - अबुधाबी | 5 दि. | 54000/- |
| श्रीलंका | 6 दि. | 63000/- |
| सिंगापूर-बँकॉक-मलेशिया | 11 दि. | 105000/- |

नेपाळ ★ भुतान ★ मॉरिशस

DISCOUNT from 1000/- To 4000/- TILL 15 SEPT.

Special Discount to SBI STAFF

राजन पाडलोसकर 9322231216

022-24318082 / 24381026

www.rajgurutours.com

# औदार्य - एक अनुभव

आयुष्यात आपल्याला अनेक माणसं भेटतात आणि पुढंही भेटत राहतात. काहींशी जुजबी ओळख होते, त्यांच नाव गाव किंवा इतर माहिती आपल्याला असतेच असं नाही. पण ती स्मरणात राहतात कायमची. स्टेट बँक पेन्शनर असोसिएशन तर्फे ०८ फेब्रु. २०१३ रोजी मुंबई झोनल सब सेंटरच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आदल्याच दिवशी घडलेला एक सुखद अनुभव! स्टेट बँकेने आपल्या असोसिएशनतर्फे वार्षिक सभेसाठी येणाऱ्या सभासदांस भेट म्हणून वाटण्यासाठी २०१३ सालची कॅलेंडर्स आणि डायऱ्या आपल्या बी.के.सी. ऑफिसमधून घेऊन जाण्यासाठी आम्हाला आदेश आले होते. आमच्यापुढे प्रश्न असा होता की हा एवढा मोठा वजनदार गठ्ठा शिवाजी मंदिर नाट्यगृहाच्या ऑफिसपर्यंत आणायचा कसा? कारण बी.के.सी. परिसरात सर्वात जर गैरसोय कुठली भासत असेल तर मदतीसाठी मनुष्यबळ आणि भाडोत्री वाहने! एक वेळ आयत्यावेळी वाहनांची व्यवस्था करता येईल, परंतु मदतीसाठी मनुष्यबळ कुठून आणणार? आम्ही आमच्याच काही मित्रांकडे सहकार्याचा हात मागितला, परंतु एवढ्या लांबून त्या पेट्या आणणं म्हणजे कष्टप्राय असल्यामुळे त्यांनी नकार दिला. कदाचित समाजकार्य करताना सर्वात आधी अहंकार गळून पडणं आवश्यक असतं, हे त्यांना माहीत नसावं! शेवटी मी आणि आपल्या असोसिएशनचे प्रिंसिपल सेक्रेटरी श्रीयुत राजीवडेकर अशा दोघांनी मिळून ते महाकाय बॉक्सेस आणण्याचं ठरवलं. सभेच्या आदल्या दिवशी म्हणजे ७ फेब्रुवारीस दुपारी अडीच वाजता ठरल्याप्रमाणे आम्ही कॅलेन्डर्स व डायऱ्यांचा ताबा घेतला. बी.के.सी. ऑफिसच्या दरवाजापाशी ते गठ्ठे रचून, टॅक्सीच्या शोधात इकडे तिकडे भटकू लागलो. शोधता शोधता एका टॅक्सीवाल्यांची कशीबशी मनधरणी केली. त्याला बाबा-पुता करून बँकेच्या दरवाज्यापाशी आणला. परंतु जवळ जवळ १०० किलोच्यावर वजन असलेली ती २४ पाकिटे पाहून तो बिथरल्यासारखाच झाला! पोलीस पकडेगा 'टॅक्सी दबेगा' 'नही जमेगा' चा धोशा लावत चक्क येणार नाही म्हणून सांगितले. शेवटी एकदाच त्याला गाजर दाखवत अडीचशे रूपये टॅक्सी भाड्याचे व अतिरिक्त अडीचशे रूपये सामानाचे असा सौदा पटवून तो टॅक्सीवाला एकदाचा तयार झाला. त्यानंतर भराभर आम्ही टॅक्सीच्या डिकीत, वरती टपावर, बसतेवेळी आमच्या सीटच्या आजूबाजूला, आपापल्या मांडीवर असे ते गठ्ठे ठेवले आणि टॅक्सी शिवाजी मंदिर नाट्यगृहाच्या दिशेने धावू लागली. वाटेत 'पोलीस पकडेगा तो आप संभालना' मेरा लायन पोलीस ले लेंगे तो मैं क्या खाएगा? असा वाक्यांची रट चालूच होती. आम्ही त्याला समजावण्याच्या सुरात 'भगवान का नाम लो' अच्छे काम करनेवालोंका कभी बुरा नहीं होता' अशा तऱ्हेचे संवाद ऐकवत त्याला दिलासा देत होतो. शेवटी एकदाची शिवाजी मंदिरच्या दारात गाडी सुखरूप येऊन ठेपली. उतरल्यावर ते २४ मोठाले गठ्ठे मी आणि राजिवडेकर यांनी आमच्या परीटघडीच्या कपड्यांची पर्वा न करता शिवाजी मंदिरच्या ऑफिसपर्यंत नेण्याचा आमचा आटोकाट प्रयत्न पाहून तो टॅक्सीवाला सुद्धा आमच्या मदतीला धावून आला. आता पैसे देण्याची वेळ आली. ठरल्याप्रमाणे राजिवडेकरांनी टॅक्सीवाल्याला पाचशेची नोट देऊन त्याचे आभार मानले... त्यानंतर अघटितच घडलं! खिशातून तीनशे रूपये काढून परत करत त्याने आश्चर्याचा धक्काच दिला. ह्या अनपेक्षित हिशोबाचा अंदाज न लागल्यामुळे पैसे घेताना 'हे काय?' म्हणून विचारले असता तो नम्रपणे म्हणाला, 'इतने उमरके होके भी आप लोगों के लिए इतना अच्छा काम कर रहे हो, तो मेरा भी कुछ फर्ज़ बनता है। मेरे लिये सिर्फ पेट्रोल का दो सौ रूपया काफी है।' हे ऐकून त्याच्या तोंडाकडे आ वासून बघण्याशिवाय दुसरा पर्याय आमच्यापाशी नव्हता! टॅक्सीने हळूहळू वेग घेतला. जाता जाता टॅक्सीचा नंबर पाहिला. नंबर होता एम.एच ३७१७. त्या भल्या आणि सामान्यातील असामान्य टॅक्सीवाल्याचं नाव विचारल, त्याचं नाव होतं 'अब्दुल कादर'!! घरी परत जाताना वर उल्लेख केलेल्या मित्रांची मी अब्दुल कादरशी मनातल्या मनात नकळत तुलना करीत होतो.

आज-कालच्या आपमतलबी जीवनशैलीत अब्दुल कादर सारखी औदार्य जपणारी माणसं समाजात आहेत हे आपलं केवढं भाग्य!

**- माधव नाडकर्णी**, मुंबई
९८१९०८४३८०

## * आवाहन *

**कथा, ललित लेख,**
**विनोदी लेख, दर्जेदार विनोद-**
**चारोळया इत्यादी साहित्य**
**'संवाद'साठी पाठवावे.**

**- संपादक**

## मामाच्या गावाला जाऊ या

गतकाळातील आठवणींच्या चांदण्या होतात. त्या काळी सुट्टीत हक्काने जाण्याचं एकच ठिकाण असायचं. मामाचं 'आहेरवाडी' हे गाव. स्टेशनवर उतरलो की गावाकडे नेण्यासाठी घरची बैलगाडी आलेलीच असायची. बैल धावत असताना जीव मुठीत घेऊन बसायचो. पण कधी 'कासरा' आपल्या हातात असावा असंही वाटायचं. बैलांच्या गळ्यातला तो घुंगरांचा आवाज अजूनही कानात आहे.

मामा गावचे सरपंच, कुलकर्णी 'वतन' असलेले मानकरी. त्यांचा मोठ्ठा चौसोपी वाडा, डाव्या-उजव्या हाताला 'ढेळज' सैंपाकघर, माजघर, देवघर, कोठीची खोली, सगळं कसं ऐसपैस.

पहाटे देवळातला नगारा वाजायचा आणि 'माळवदावर' चांदण्यांच्या पांघरुणाखाली झोपलेल्या आम्हा भावंडांना जाग यायची. खरंतर कवितांच्या आणि गावाच्या नावांच्या भेंड्यांनी आख्खी रात्र जागवलेली असायची. 'मामी' चरवी घेऊन 'कपिला' गाईचं फेसाळ शुभ्र दूध काढायची. निरसं दूध पिताना गाला-ओठांवर पांढऱ्या मिशा यायच्या.

शेतात मामे भावंडं मोटेच्या जागेपासून उंचावरून विहीरीत धडाधड उड्या मारायची. मला मात्र पोहता येत नसल्यानं, मी कसाबसा खाली काठावरच्या पायरीवर त्यांचा टॉवेल सांभाळायचो. सारे हसायचे. आंघोळीनंतर वडाच्या झाडाखाली मातीच्या ढेकळावरच हाताची उशी करून आम्ही गार वारा खात कसे मस्त पडले राहायचो. तापलेली उन्हं आणि सूर्याचे कवडसे पानांमधून धुळीचे कण दाखवायची.

'चैत्रात' महादेवाची जत्रा भरायची. कुस्त्यांचा फड जमायचा. सरपंच म्हणून मानाने गावकरी मामाला आमंत्रण करायला यायचे, अन् वाजत गाजत घेऊन जायचे. रात्री गॅस बत्तीच्या प्रकाशात हनुमान जन्म, राम-रावण युद्ध ही नाटकं कानडी भाषेतून पहाटेपर्यंत खेळली जायची.

मामी पुरणपोळीचा बेत करायची. आढीला लावलेले पण तयार झालेले आंबे काढून मग आंबरसाचं तृप्त जेवण व्हायचं. रसानी ढोपर भिजायचं- कोय, साल, सारं चाटूनपुसून साफ व्हायचं!

सुट्टी संपल्यावर घरी परतताना पाणावलेल्या डोळ्यांनी आजी कपाळाला हात लावून इडा-पीडा काढायची अन् बटव्यातला चांदीचा रूपया हातावर ठेवायची. 'बापाविना पोर' म्हणून मामा माझे जास्त लाड करायचा. बहिणीच्या काळजीने घरच्या ज्वारीचं 'चुंबड' सोबत पाठवायचा. मन जड व्हायचं तेव्हा.

आता मुलांना मामाचा गाव चित्रपटातून पाहावा लागतो. सुट्टीत त्यांना कोठे पाठवायचं हा यक्ष प्रश्न उभा राहतो. पैसे भरून पंधरा दिवसांसाठी संस्कार-शिबिरात धाडवं लागतं.

सकाळचा लालभडक सूर्याचा गोळा. मोटेचा कुई-कुई आवाज, विहीरीत उडी मारल्यावर उसळणारं फेसाळ पाणी, शेताजवळून गेलेली लालचुटूक पायवाट, कंदीलाच्या प्रकाशात भावंडांसमवेत रंगलेल्या भूतांच्या गोष्टी- हे सारं क्षितिजा पलिकडं गेलंय. मुलांनाही त्याचं अप्रूप नाहीय. बंद दाराआड एकेकट्याने वाढणाऱ्या पिढीच्या हातात मोबाईल्स आहेत, कॉम्प्युटर लॅपटॉप आहे. बाहेरचं जग जवळ येतंच पण जवळचे सारे दूर होत चाललेत.

कमावल्यापेक्षा गमावल्याचं दु:ख अधिक आहे.

- **शशिकांत लावणीस**, सोलापूर
भ्रमणध्वनी - ९४२१०२६२७९

## मी निवृत्त झालो

मी निवृत्त झालो
मुक्त झालो
कामाच्या व्यापातून
जबाबदारीच्या जोखडातून
खेळातून
आणि खेळण्यातून
बंद झाला
एकमेव 'एकमार्गी' रस्ता
शेकडो मार्ग खुले झाले
मोकळा श्वास उजवीकडे
डावीकडे, निर्मळ आनंद
आणि असे कित्येक
दुभाजक नसलेले, सिग्नल नसलेले
आणि हो
खड्डेही नसलेले !
........
रोज नव्या रस्त्यावर
नव्या नव्या वळणावर
तीच हूरहूर तीच ओढ
नवं 'रूटीन' सुरू झालं

**- नी. व. ओढेकर, नासिक**
भ्रमणध्वनी - ८९७५८२२८००

# आठवणी दाटतात...

एकोणीशसशे चौऱ्याहत्तर ते एकोणीसशे सत्त्याहत्तरचा काळ होता. इ.डी.पी. सेंटरमध्ये मी, श्री. सुधीर राव, एस्टॅब्लिशमेंट सेक्शनचे मॅनेजर, कै. बाळासाहेब त्रिलोकेकर, श्री मोहन आजवेलकर मराठी वाङ्मय मंडळ चालवत होतो. त्याच्या बरोबरीने कँटीनच्या बाहेर जो मोठा नोटीस बोर्ड होता, त्यातील काही भाग संपादकीय (मी व श्री. मोहन आजवेलकर लिहित असू.) आणि कर्मचाऱ्यांच्या कविता, लेख इ. साठी वापरत होतो. पुष्कळदा पुरेशा कविता किंवा लेख नसेल तर आयत्या वेळी मी माझ्या कविता किंवा छोटा लेख लिहून बोर्डावर लावी. असंच एकदा मी माझी 'परीक्षा' ही कविता लावली. आय.ओ.ए. डिपार्टमेंट मधले पाचव्या मजल्यावरचे एक अधिकारी श्र. आंबे ह्यांनी त्या कवितेतील मुद्यांच्या विरोधी भूमिका घेऊन कविता केली व बोर्डावर लावली. ती वाचून मी पुन्हा त्यावर उत्तर म्हणून दुसरी कविता केली व लावली. असं करत आमच्या दोघांच्या प्रत्येक तीन कविता बोर्डावर एकाच दिवसात लागल्या. सहावी कविता लागेपर्यंत दुपारचे सव्वा तीन वाजले. ऑफिसची वेळ सकाळी नऊ ते संध्याकाळी चार अशी होती. त्यामुळे श्री. मोहन आजवेलकर यांनी बोर्डावर नोटिस लावली की आता ही कवितांची जुगलबंदी बंद करीत आहोत. त्या दिवशी सकाळी साडेदहा ते सव्वातीन मधल्या ह्या कविता संपूर्ण गव्हर्नमेंट अकाउंटस् व आय.ओ.ए. डिपार्टमेंटचे लोक दिवसभर आपलं काम सांभाळून वाचत होते. इ.डी.पी. सेंटरमधील त्या वेळच्या कलीग्जना ही जुगलबंदी निश्चितच आठवत असेल. मराठी वाङ्मय मंडळात आम्ही सर्वश्री श्रीमरा लागू, श.ना.नवरे, लालन सारंग, कमलाकर सारंग, शाहू मोडक, रमेश देव, सीमा देव, इ. दिग्गजांची व्याख्यानं किंवा आम्ही घेतलेल्या त्यांच्या मुलाखती, त्यांच्या आठवणी इ. कार्यक्रम सादर केले होते. त्यातच एकदा मंगेश पाडगावकरांचं काव्यवाचन ही ठेवलं होतं. त्यावेळी इ.डी.पी.मधील आम्ही काही कर्मचाऱ्यांनी आमच्या कविताही सादर केल्या होत्या. त्या काळात आणि नंतरही माझ्या असंख्य कविता,, लघुकथा मासिकांमध्ये प्रकाशित झाल्या. कादंबऱ्यासुद्धा पुस्तकरुपाने प्रकाशित झाल्या व होत आहेत. जवळजवळ बावीस कादंबऱ्या मी आजपर्यंत लिहिल्या. अनेक पारितोषिकं, सुवर्णपदक वगैरे मिळालं. तरीही एवढ्या मोठ्या दिग्गज कवीसमवेत मला काव्यवाचन करण्याची अप्रतिम संधी मिळाली हे माझं परम भाग्य होय.

**- उज्ज्वल ब्रम्हांडकर**



# वाढदिवस

आपण भारतीय वर्ष भरात वेगवेगळे सण उत्साहाने साजरे करतो. तसेच वर्षातील दोन महत्त्वाचे दिवस न विसरता वेगळ्या तऱ्हेने साजरे करतो ते म्हणजे आपल्या पत्नीचा वाढदिवस व आपल्या लग्नाचा वाढदिवस.

सौ. व श्री. सत्यम खरे व श्री. रसिक व रसिका खोटे यांचा वाढदिवस कसा साजरा झाला ते आपण पाहू या.

१) बहुतेक वेळा पुरुष बायकोचा वाढदिवस नेमका विसरतो त्यासाठी सत्यम्ने ऑफिसला जाताना आपल्या मोबाईलमध्ये संध्याकाळचा गजर लावून ठेवला होता. कारण त्या दिवशी त्याच्या बायकोचा म्हणजे सौ. सावित्रीचा वाढदिवस होता. संध्याकाळी गजर होताच त्याने घरी येताना बायकोसाठी छान मोठासा पुष्पगुच्छ विकत घेतला. घरी येताच पत्नीस त्याने हाक मारली व म्हणाला, ''सावित्री हे बघ वाढदिवसानिमित्त तुला काय आणले आहे?'' तिने गुच्छ पाहताच म्हणाली, ''किती छान आहे!'' त्यावर सत्यम म्हणाला, ''त्यातील फुले मोज म्हणजे तुला एक गंमत समजेल.'' तिने फुले मोजली व म्हणाली, ''अहो चाळीस आहेत.'' ''अगं तू चाळीस वर्षाची झालीस म्हणून असा गुच्छ आणला.'' ते ऐकताच सावित्री चिडली. तिने तो गुच्छ सत्यमच्या अंगावर फेकला. त्याचा चष्मा खाली पडून फुटला आणि ती म्हणाली, ''बरे झाले तो चष्मा फुटला तुम्हाला त्यातून मी एवढी वयस्कर वाटते. तो आता बदला. मागील महिन्यात आपल्या कॉलनीत होम मिनिस्टरचा कार्यक्रम झाला. त्यावेळी आदेश भाऊजींनी मला जिजामाता साडी प्रेझेंट दिली व म्हणाले, ''वहिनी तुम्ही जीवन व जान्हवी या दोन मुलांच्या माता आहात हे सांगून देखील खरे वाटणार नाही आणि तुम्हाला तशी दृष्टीच नाही.'' त्या रात्रीचा मेजवानीचा बेत रहित झाला व रात्री सत्यम जेव्हा बिछान्यावर झोपला तेव्हा लांबून गाण्याचे सूर ऐकू येत होते - ''मैं जिंदगीमें हरदम रोताही रहा हूँ...''

२) इकडे रसिकने देखील त्या दिवशी त्याच्या पत्नीचा म्हणजे सौ. रसिकाचा वाढदिवस असल्यामुळे लक्षात राहण्यासाठी आपल्या मोबाइलमध्ये संध्याकाळचा गजर लावला व ऑफिसमधून घरी येताना पुष्पगुच्छ व सौंदर्य प्रसाधनातून लिपस्टीक विकत घेतली. घरात येताच त्याने रसिकास प्रेमाने हाक मारली व ती बाहेर येताच तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. रसिका म्हणाली, ''अहो माझ्या आवडीचा गुलाबाचा गुच्छ अगदी आठवणीने आणला.'' तेव्हा रसिक म्हणाला, ''अगं त्यातली फुले मोज म्हणजे तुला खरी गंमत कळेल. तिने ती मोजली व म्हणाली, ''पंचवीस आहेत.'' त्यावर रसिक म्हणाला, ''अगं आज तुझा पंचविसावा वाढदिवस म्हणून तर!'' त्यावर रसिका म्हणाली, ''अहो असं काय करता? आता मी चाळीस वर्षाची झाले व आपल्याला दोन मुले आहेत हे विसरला की काय?'' रसिक म्हणाला, ''मला आता चष्मा बदलावा लागेल असे वाटते.'' तेव्हा ती म्हणाली, ''काही नको आहे तोच राहू द्या.'' नंतर रसिकाने त्याला स्वयंपाकघरात नेऊन त्याचा आवडीचा गाजराचा हलवा व आइसक्रॅन्डी खायला दिले. रसिकने तिला बाहेर हॉलमध्ये नेले व म्हणाला, ''या खिडकीतून खाली बघ काय दिसते? ती पहात म्हणाली, ''काही नाही रस्ता व माणसे.'' ''अगं तेथे नाही आपल्या खिडकीखाली.'' तेथे पाहताच ती आनंदाने म्हणाली, ''मारूती कार.'' रसिक म्हणाला, ''तुला आवडतो तो रंग?'' ती अत्यानंदाने म्हणाली, ''गुलाबी माझा खूप आवडीचा.'' तेव्हा रसिकने तिच्या हातावर लिपस्टीक ठेवली व म्हणाला, ''हे बघ त्याच रंगाची ही लिपस्टिक आहे. रात्री छान मेजवानी झाली. रसिकचे १५ फुलांचे व चष्म्याचे पैसे वाचले. तो जेव्हा बिछान्यावर झोपला तेव्हा लांबून गाण्याचे सूर ऐकू येत होते. ''बरसातमें हमसे मिले तुम सजन.....''

**- गोपाळ वि. मुळे,** अहमदनगर
भ्रमणध्वनी - ९८९०८६३८६९



व्यक्ति-विशेष

## कर भला सो हो भला!

श्री. गुलाब शेख, आता हाजी गुलाब शेख. सातारा येथील आपले एक अतिशय क्रियाशील सभासद. सामाजिक, कर्तव्याची जाण आणि भान असणारे शेख २००१ मध्ये स्वेच्छानिवृत्त झाले, पण निवृत्त झाले ते बँकेतून, रोजच्या जीवनातून नाही. सतत कार्यरत राहण्याचा स्वभाव असल्याने समाजासाठी काहीतरी करायला पाहिजे, या तळमळीने त्यांनी, त्यांच्या समाजातील सुशिक्षित असे सरकारी, शैक्षणिक, बँकिंग व इतर क्षेत्रातून सेवानिवृत्त झालेल्यांना एकत्र आणले. अशा ५०/५५ सभासदांनी प्रत्येकी रू. १००/- मासिक वर्गणी गोळा करून सातारा शैक्षणिक व सांस्कृतिक सोसायटीची २००४ मध्ये स्थापना केली. ह्या सोसायटी मार्फत त्यांच्या समाजातील गरीब, होतकरू व हुशार विद्यार्थी/विद्यार्थीनींना उच्च शिक्षणासाठी, व्यवसाय शिक्षणासाठी मदत देण्यास सुरवात केली. त्यांचे हे काम पाहून समाजातील दानशूर व्यक्तिंनी पुढे येऊन संस्थेच्या चांगल्या कामावर विश्वास व्यक्त करून उदार हस्ते देणग्या दिल्या व देत आहेत. विशेषत: पवित्र रमजान महिन्यात अशा देणग्या भरपूर मिळतात. १०० रूपया पासून रू. २०,०००/- पर्यंत जवळ जवळ ३५० लोकांनी देणग्या देऊन सोसायटी वर प्रेम व्यक्त केले आहे.

हमने तो लगाया पौधा  
सौ सौ लेकर जमा किये ।  
लोगो ने देखा परखा  
तो हजार हजार ले आये ।।

ह्या सर्व कार्यात श्री. शेख यांच्या मदतीला जवळ जवळ १०० कृतिशील सभासद असून सोसायटीच्या अध्यक्षपदाची धुरा स्वत: समर्थपणे वाहात आहेत. सोसायटीने आता दहाव्या वर्षात पदार्पण केलेले आहे व त्यांनी प्रगतीचा आलेख चढताच ठेवला आहे.

आतापर्यंत ८१ विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी ४ लाख ७२ हजारांची आर्थिक मदत केली आहे. तसेच प्राथमिक, माध्यमिक व तांत्रिक शिक्षणासाठीही त्यांनी भरपूर मदतीचा हात दिला आहे.

१२ वी पर्यंत शिक्षण प्राप्त महिलांना विविध व्यावसायिक कोर्सेस करण्यासाठी, त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहाण्यासाठी एकूण ३८६ महिलांना जवळ जवळ चार लाख रूपयांची मदत दिली आहे.

या शिवाय विविध संस्थांमार्फत, सरकारी योजनांमार्फत शिष्यवृत्ती मिळवून देणे किंवा बँकांमधून शैक्षणिक कर्जे मिळवून देणे, अशीही कामे सोसायटीचे सभासद निष्ठेने करीत आहेत.

श्री. गुलाब शेख यांनी आता सोसायटीच्या कामाचा आवाका सातारा शहरापुरता मर्यादित न ठेवता ते जिल्हाभर या सामाजिक उपक्रमासाठी मार्गदर्शन करीत आहेत. कार्यकर्ते तयार करीत आहेत. आधी केले मग सांगितले.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी ज्या सातारा जिल्ह्यात रयत शिक्षण संस्था उभारून शिक्षणाची आमराई फुलविली त्याच भूमीत श्री. गुलाब शेख यांनी हे नवे रोपटे लावले आहे.

श्री. गुलाब शेख व त्यांच्या सहकाऱ्यांचे त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**- वसंत धुपकर,** पुणे  
०२०- २०२५५५०४

## ऋतु चक्र

कां लाविसी बोल नशिबा  
दु:ख येता दारी?  
अरे, दु:ख म्हणजे असे सुखाचा  
सख्खा शेजारी!

ऊन जेव्हा डोईवरती  
ताप देते वाटते  
जन्म होतो सावलीचा  
जरी पायी ती मिटते  
ग्रीष्मापाठोपाठ बरसती पावसाच्या सरी!

रात्र जेव्हा काजळते  
दाटतो अंधार सारा  
बघ, प्राचीवरती उगवतो  
प्रकाशाचा शुभ्र तारा  
अमावस्येचे भाग्य उजळते, प्रतिपदेच्या चंद्रकोरी!

प्रश्न जेव्हा अडवतो  
उत्तर करते मार्ग खुला  
शिशिराच्या पानगळीवर  
वसंत फुलतो झुले झुला  
विरह-वणवा चेतवी अंगी, मीलनाची शिरशिरी!

**- गोविंद करमरकर,** सांगली  
भ्रमणध्वनी - ८८०५९५९८२४

# रस्ता

रस्ता असो मातीचा
रस्ता असो डांबराचा
रस्ता असो सिमेंटचा
रस्ता बिचारा रस्ता
रोज खाई लाथा अन् खस्ता

रस्ता असो पायवाटेचा
रस्ता असो गल्ली -बोळाचा
रस्ता असो महामार्गाचा
रस्ता बिचारा रस्ता
रोज खाई लाथा अन् खस्ता

पाणीवाले, वीजवाले खणणार
गटार, फोनवाले खणणार
असेच अत्याचार होत राहणार
रस्ता बिचारा रस्ता
रोज खाई लाथा अन् खस्ता

राष्ट्रपती, पंतप्रधान येई
रस्ता चटकन स्वच्छ केला जाई
परत तो दुर्लक्षित होई
रस्ता बिचारा रस्ता
रोज खाई लाथा अन् खस्ता

रस्ता आहे घटनांचा साक्षीदार
परी वाहे घाणीचाच भार
कोणाच्या, केव्हा लक्षात येणार?
रस्ता बिचारा रस्ता
रोज खाई लाथा अन् खस्ता

- **अरुण भट,** बदलापूर (पूर्व)
मो.- ९६०४३८३६०७

## दिवस आणि रात्र

दिवस उजाडतो तो मुळी
इतरांचा वाटेकरी होऊनच
रूटीन सांभाळावं लागतं ते मुळी
स्वत:ला वजा करूनच ॥१॥

तास, मिनिटे सेकंदाची
बेरीज वजाबाकी करताना
हाती येते शून्य अन
स्वत:ला शोधताना
मन होते सुन्न ॥२॥
म्हणूनच
रात्रीच्या कवेत शिरताना
काळोखाचा पहारा ठेवून
स्वत:ला आंजारत गोंजारत
माझी मी मलाच गवसते ॥३॥
भावनांचा कल्लोळ असतो
विचारांची गर्दी असते
कुशी बदलताना
खाटेचा कुरकुरणारा आवाज असतो
अन् माझ्या सोबतीला मीच असते ॥४॥

- **सुषमा तिळवे, फोंडा गोवा**

## मुंबईची लोकल

नऊ तीनची लोकल पकडू द्या की, मला चौथी सीट तरी मिळू द्या की
झाल्या आहेत साऱ्या मैत्रिणी, उतरली सी.एस.टी. वरती
कापिती केक वाढदिवशी, केळवणेही न्यारी करिती
देती न्याय साऱ्यांशी, नसे भेदभाव थाऱ्याशी ॥१॥

गाणी गाती उडत्या चालीची, करमणूक करिती साऱ्यांची
कुकरी शोजही ऐकविती, नात्या गोत्यालाही जाणिती
पुस्तकांची देवाण घेवाण करिती, एमब्रॉयडरीही शिकविती
मुलांचे विषयही वर्णिती, सासवांचे प्रेमही आळविती ॥२॥

वार्षिक सहलही आयोजिती, डोहाळेही खास पुरविती
लग्न समारंभास येती, भल्या बुऱ्याचा पाढाही वाचिती
प्रसंगी धावून येती, नव्यांना सामावून घेती
कळू न देती कधी आली डोंबिवली, अशीच आली सेवानिवृत्ती ॥३॥

- **साधना धारवाडकर, डोंबिवली**
**मो. : ९३२२७९५६९१**

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010**
**Permission to Post without Prepayment No.: WPP-217 at Market Yard P.S.O. on 25th of each Month**

# गोड संकेत

गोड शब्द तुझ्या ओठावरले
आगळ्या गंधाने भिजले होते
गंधाने भारलेल्या त्या शब्दांनी
मला वेगळ्या नशेत नेले
डोळ्यातील भावूक स्वप्नांचा तुझिया
माझ्या डोळ्यांनी साथ दिली
नाजूक पापण्यांवरूनी तुझिया तेव्हा
चांदण्याची बरसात झाली
तव गळ्यातील आर्त सूरांनी
वेदना जागविल्यास माझ्या
तुझे ते अल्लड चाळे पदराचे
गोड संकेत मजला देऊनी गेले

**- दिलीप अ. रेडकर,** मुंबई
दूरध्वनी - २८७३५६१३

# जन्मा येऊनी

मनुष्याच्या जन्मा यावे । क्षेम कल्याण करावे
आंधळ्याची श्वेत काठी । दुर्बलाची लाठी व्हावे ।।१।।
तहानला बळीराजा । थंडगार पाणी व्हावे
होई श्रमिक भुकेला । भाकरी न् भाजी व्हावे ।।२।।
नाही निवारा बेघरा । खोपटं तयाला द्यावे
अडाण्याच्या मनामध्ये । ज्ञानदीप उजळावे ।।३।।
पिडलेल्या आजाऱ्याचे । औषध जालीम व्हावे
मैफलीच्या गायकाचा । चिरेबंदी सूर व्हावे ।।४।।
शैशवाचे हास्य व्हावे । तारुण्याचा जोश व्हावे
थकलेला हात हाती । वृद्धत्वाला आधारावे ।।५।।
व्हावे चंदन, झिजावे । व्हावे कापूर, जळावे
प्राणाहुती देऊनिया । सुगंधाचे फूल व्हावे ।।६।।
शिपायाचे शौर्य व्हावे । माऊलीचे धैर्य व्हावे
कोणा आशा किरणाची । अंगणी त्या सूर्य व्हावे ।।७।।

**- अरुणा मदन नगरकर,पुणे**
**मो. : ९६५७१४००९५**

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.